# यशोगंध



यशवंत

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ८२५

REFBK-0005368

ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स्थळ प्रत
सं. क्रमांक नं. ११०७
ता. २५-५-१९३५
ठाणे.

रविकिरणमण्डळाचें चोविसावें पुस्तक

# यशोगन्ध

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५३६८

## यशवन्त

यांच्या स्फुट कवितांचा
चौथा सङ्ग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ग्रं. नं.
ता.
ठाणे

REFBK-0005368

आवृत्ति पहिली

जानेवारी १९३५

किंमत एक रु.

भाषान्तरासहित सर्व हक्क कवीकडे

प्रकाशक { यशवन्त दिनकर पेण्ढरकर,
गायकवाडवाडा, ५६८ नारायण पेठ; पुणें नं. २.

मुद्रक { एम्. एन्. कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस, कर्नाटक हाऊस, चिराबजार, मुम्बई नं. २.

यशोगन्ध–समर्पण

१७–११–१९३४

# सौ. नीरास

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ………… नं. …………
ता. …………
ठाणे.

यशवन्त

# कवि यशवन्त यांचीं पुस्तकें

—:o:—

**मित्र-प्रेम-रहस्य.** (किं. चार आणे). मित्र-विरहावर एक सुन्दर करुण-रसपर काव्य. कविता मनास चटका लावणारी असून प्रारम्भींचें अल्प चरित्रही मनन करण्याजोगें आहे. —"**केसरी.**"

**यशवन्ती.** (किं. दहा आणे). निरनिराळ्या प्रसङ्गीं प्रकाशित केलेल्या कविता कवीनें पुस्तकरूपानें एकत्रित केल्या आहेत. कविता सरस व स्फूर्तिदायक आहेत यांत शङ्का नाहीं.—

—**चित्रमयजगत्.**

**यशोधन.** ["इन्दुकला" या काव्यासह]. (किं. दीड रु.). रसिकांच्या अत्यन्त आवडीचा कवितासङ्ग्रह. "यशवन्त जितके कल्पक तितकेच सहृदय आहेत ... 'यशोधनांत दृष्टीला पडणारें कल्पना-वैभव अतिशय उज्ज्वल आहे...इतकीं विविध आणि इतकीं उत्कृष्ट भावगीतें नवीन पिढींतील दुसऱ्या कोणत्याही कवीनें लिहिलेलीं नाहींत."—**ग. त्र्यं. माडखोलकर**—(**अरुण मासिक**).

**भावमन्थन** (किं. आठ आणे). 'यशोधना'चें हें भावण्ड तितकेंच सरस आणि भावमधुर आहे. —**वि. स. खांडेकर.**

**बन्दीशाळा** (किं. दीड रु.). बालगुन्हेगारांच्या करुण स्थितीवरील खण्डकाव्य. "काव्यप्रतिभेनें रसरसलेलें, उपमासौंदर्यानें नटलेलें, वत्सलतेनें भरलेलें, करुणरसानें पाझरलेलें व नीतिकुसुमांनीं मोहर-लेलें असें हें यशवन्ताचें खण्डकाव्य आधुनिक काव्यांत अप्रतिम असून महाराष्ट्रीय रसिकांच्या अंतःकरणांत त्याला चिरकाल स्थान मिळेल अशी आशा आहे." —**विविधवृत्त.**

**जय-मङ्गला** (किं. एक रु.) या काव्यांत "यशवन्त" रसिकांना राज-कन्येच्या महालांत घेऊन जात आहेत....प्रणयाचे मधुर भाव आणि यशवन्तांची ओघवती कल्पना यांचा सरस संगम या भाव-काव्यांत अनेक स्थळीं आढळतो...यशवन्तांच्या प्रतिभेचे कल्पकता व ओज हे दोन अत्यंत प्रभावी विशेष आहेत. —**प्रतिभा.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. क्रमांक ...
ता. ...
ठाणे.

# यशोगन्धांतील गन्ध–रेणु

पृष्ठ


| | |
|---|---|
| प्रस्तावना–उन्मीलन (प्रो. श्री. वा. रानडे) | ९ |
| कविता | |
| पुष्पसमर्पण | १६ |
| अन्य नको वरदान | १७ |
| तृषा–निवारण | १९ |
| स्वभाव–धर्म | २१ |
| क्षुद्र जीवजन्तूस | २२ |
| तमाशा | २३ |
| कोणाचे आम्ही कोण | २४ |
| मातृभोजन | २८ |
| मातेस | २९ |
| आज्ञाभङ्ग | ३२ |
| रङ्कार्चे वैभव | ३३ |
| शापित नक्षत्रें | ३४ |
| झाल्या तिन्हिसाञ्जा | ३६ |
| अभिनयपटूस | ३८ |
| आत्माहुति | ४० |
| सैनिकास | ४१ |
| विमानांतून पुष्पवृष्टी | ४३ |
| सत्य न मरतें दळभारें | ४४ |


मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ...
ठाणे

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| इतुकें का सोपें रे ? बन्ध तोडणें | ४६ |
| सेवावृत्ति | ४८ |
| विपरीत रीत | ५० |
| धरा हो अन्त्यजां हातीं ! | ५२ |
| एक-दोघां विद्यार्थ्यांस दिलेला हस्तलेख | ५३ |
| कुत्रा आणि आगगाडी | ५४ |
| शरीर-सम्बन्ध | ५५ |
| जोडीदारास | ५६ |
| प्रियाराधना | ५८ |
| राग-रङ्ग | ५९ |
| परतुनी येणार नाहींस का ? | ६० |
| गुन्हेगारीण | ६१ |
| स्फूर्तिदेवता | ६३ |
| मनोवासिनीस | ६५ |
| स्वप्न-सम्भ्रम-१ | ६७ |
| स्वप्न-सम्भ्रम-२ | ६८ |
| चन्द्र-ग्रहण | ६९ |
| येसि कशाला दारीं ? | ७० |
| वाळलेला वृक्ष | ७२ |
| क्षणिक चान्दणें | ७३ |
| जीर्ण मठालगतच्या नदीचें मनोगत | ७४ |
| अपरिचितेची ओढ | ७७ |
| सौन्दर्या विसरेन का ? | ८१ |
| ? चन्द्रसेनेस | ८२ |
| प्रतिमालेखन | ८३ |

| कविता | पृष्ठ |
| --- | --- |
| तारिणी | ८५ |
| "—स" | ८६ |
| संसार-सखी | ८८ |
| आवाहन—१ | ९० |
| आवाहन—२ | ९१ |
| हे तीरावरल्या बाले ! | ९२ |
| गोरज मुहूर्तावर | ९४ |
| घर-भरणी | ९५ |
| गोलघुमटांत | ९६ |
| सङ्क्रान्तिचा तो दिवस ! | ९७ |
| एकरुपता | ९९ |
| हिरे ?—छे, निखारे ! | १०० |
| जा सुखें पाखरा | १०२ |
| शैवालानें आच्छादलेल्या विहिरीचें गाणें—१ | १०४ |
| ,, ,, ,, ,, —२ | १०६ |
| निष्ठुर ईश्वरास | १०८ |
| विसंवाद | ११० |
| विरोधी घटना | १११ |
| अन्तरींचा वैरी | ११२ |
| वञ्चनेच्या वाळवण्टीं | ११३ |
| अन्धार | ११४ |
| दैवी सूड | ११६ |
| भङ्गतो आडसर आज | ११७ |
| भरधाव फेक तव वारु मना | ११९ |
| चढवितों मुखवटा आज नवा | १२० |

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| जग–रहाटी | १२२ |
| यशःपथावर | १२४ |
| मोक्षाचीं दारें | १२५ |
| गुलामा ! ओळख ही कुठली | १२७ |
| चिमुकल्या करपाशीं | १२८ |
| माईच्या दारीं | १३२ |
| संसार उपवना ऐसा | १३३ |
| अनुग्रह | १३४ |

स्थळ प्रत
ता.

# उन्मीलन

'इतिहासाची पुनरावृत्ती होते, एकाद्या क्षुल्लक माणसाच्याही आयुष्यांत तेच तेच प्रसंग पुनःपुनः पण थोड्याफार फरकानें येतात. अनादिकालापासून चालत आलेल्या सृष्टिदेवीच्या जीवनप्रयोगांत ही पुनरावृत्ती–सुधारून वाढविलेली आवृत्ती–होते असें विकासवादी म्हणतात. चक्रनेमिक्रम नसून जीव चक्राकार गतीनें विमानाप्रमाणें उंच उंच ध्येयाकडे जात आहे, जीवित हें कालप्रवाहावरील बुडबुड्याप्रमाणें असलें तरी काव्य त्या बुद्‌बुदावरील तरल, मनोहर रंगच्छटांप्रमाणें आहे; जीवित ही स्थित्यंतरांची मालिका असली तरी त्या स्थित्यंतरांच्या संक्रमणांत अनुभवास येणारीं सुखदुःखें खरीं असून त्यांतच जीविताचें साफल्य आहे......'

१४ जानेवारी १९२९ रोजीं 'यशोधना' चें 'निवेदन' केल्यापासून आज 'यशोगंधा'चें 'उन्मीलन' करीपर्यंत लोटलेल्या उण्यापुऱ्या अर्ध्या तपाचें सिंहावलोकन करूं लागलों असतां मन गंभीर होऊन, मनाची समजूत घालूं पाहणारे असे तत्त्वज्ञानाचे विचार बाहेर पडतात.

सुमारें बारा वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या रविकिरणमंडळानें आजपावेतों प्रसिद्ध केलेल्या चोवीस पुस्तकांतील 'किरण', 'उषा', 'शलाका' व 'प्रभा' या सामुदायिक संग्रहांतील भाग वगळला, तर यशवंतांनीं गेल्या सहा वर्षांत चार पुस्तकें प्रसिद्ध केलीं. भावमंथन, बंदीशाळा व जयमंगला या कथात्मक काव्यांपेक्षां यशोधनानें इतकी लोकप्रियता मिळविली कीं, त्या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या निघाल्या. नव्याजुन्या मतांच्या लोकांनीं, आबालवृद्धांनीं, रमणींनीं, चोखंदळ व निस्पृह टीकाकारांनीं, यशवंतांच्या कवितेचें कल्पनेबाहेर कौतुक करून मायेची वेडी भीति खोटी ठरविली. कवितेच्या अंतर्गत

चांगुलपणांत प्रत्यक्ष काव्यश्रवणामुळें सहज मिळणाऱ्या काव्यानंदाची भर, काव्यगायनाच्या प्रथेमुळें पडली.

भावगीतांत वर्णिलेली दुःखद स्थिति ही कवीच्या वैयक्तिक सुखदुःखांचीं प्रतिबिंबें आहेत अशी मनाची कल्पना करून घेऊन, त्याच्या हळव्या हृदयाविषयीं सहानभूती वाटल्यामुळें रसिक वाचकांना व विद्यार्थिवर्गाला यशवंतांची कविता अपूर्व वाटून मुखोद्गत करावीशी वाटली यांत नवल नाहीं. न्याहरीचें गाणें कोल्हापूरच्या एका गांवढळानें गुणगुणलेलें ऐकल्यामुळें स्वयंसेवक नाटकांत मामा वरेरकरांनीं, पूर्वीचें पद काढून या रांगडी पदाची योजना केली असें ते सहज बोलतांना म्हणाले. १९३४ च्या दिवाळीच्या सुमारास लोकप्रिय कवितांच्या सहा ध्वनिमुद्रिका (रेकॉर्ड) हिज मास्टर्स व्हॉइस ग्रामोफोन कंपनीनें प्रसिद्ध केल्यामुळें, भगवंताचें जळीं, स्थळीं, काष्टीं, पाषाणीं रूप दिसावें, त्याप्रमाणें यशवंतांचें काव्यगायन 'एकसमयावच्छेदेंकरून' अंतःपुरांत, वसतिगृहांत, चहापानगृहांत, 'बृहन्महाराष्ट्रांत' स्थळ, काळ, वेळाचे निर्बंध झुगारून, जोशांच्या लाडिक गोड लकेरींत किंवा खुद्द कवीच्या मर्दानी दणदणीत आवाजांत घुमूं लागलें. कवितांची इतकी प्रसिद्धि व लोकप्रियता साहित्याच्या इतिहासांत दुर्मिळच !

'आपल्या हयातींत स्वतःला कीर्तिशिखरावर आरूढ झालेले पाहण्याइतके भाग्यवान्,' 'कोणत्याहि आधुनिक मराठी कवीचें इतकें कौतुक महाराष्ट्रानें केलें नसेल,' असे उद्गार, त्यांच्या कवितेंतील दोषस्थलें दाखविणाऱ्या टीकाकारांनांही उदार मनानें काढावेसे वाटले.

रसिकांची आवड, काव्यश्रवणाची संधी, काव्योत्पत्तीस आवश्यक असलेली कविमनाची घडण व परिस्थिती यांत गेल्या सहा वर्षांत तिळमात्रही बदल न पडल्यामुळें यशोगंधाचें अंतर्बाह्य स्वरूप यशोधनाहून फारसें भिन्न नाहीं हें चाणाक्षांच्या लक्षांत सहज येईल. मानसशास्त्रकोविद काय उपपत्ति लावतील ती निराळी; पण दुसऱ्यांचीं दुःखें पाहण्यांत लोकांना आनंद

वाटतो. एक कवि लिहितो, Our sweetest songs are those that tell us of saddest thoughts ! ' अति दुःखदायक कहाणी त्यांचींच आमचीं मधुर गाणीं ! ' या दुःखमय कहाणीच्या मुळाशीं कांहीं तरी सत्यरहस्य असावें हा मनाला गुदगुल्या करणारा विचार, आपण कसे सुखांत आहोंत हें समाधान, दुःखीकष्टी वर्ण्य व्यक्तीबद्दल अनुकंपा यांच्या स्वादिष्ट मिश्रणामुळेंच हा आनंद उत्पन्न होत असावा. प्रस्तुत संग्रह वरवर चाळूनही वाचकांची असल्या आनंदाची अपेक्षा पूर्ण होईल.

९ मार्च १९३५ रोजीं यशवंतांच्या वयाचीं छत्तीस वर्षें पूर्ण होतात व आयुष्यांतले ' खडाष्टक ' संपतें. ऐन पंचविशींतील उद्दामपणा तिशीच्या सुमारास ओसरलेला दिसला तसा तिशीचा ऐश्वर्योन्माद पुढें टिकला नाहीं. यशोधनांतील ' खंडणीबरोबर खलिता ' ही दरबारी थाटाची भाषा व कवितेवरील धनाचें रूपक त्याज्य वाटूं लागून, स्वतःस जाळून घेणाऱ्या उदबत्तीच्या गंधमय कणाप्रमाणें, सर्वस्वाचा होम करणाऱ्या फुलांतील गंधित परागकणाप्रमाणें अथवा उडून जाणाऱ्या सुवासाप्रमाणें आपल्या कविता होत, ही भावना कविमनांत डोकावूं लागली आहे. यशोधनाच्या शेवटीं बाहेर पडलेल्या ' तर तुम्हीच मग ह्या घ्या हो माझ्या फुला ' ह्या पुष्प-समर्पणाचा प्रतिध्वनी यशोगंधांत प्रारंभींच घुमत आहे. ' अन्य नको वरदान ' व ' अनुग्रह ' या आदि-अंताच्या कविता परमेश्वराची आळवणी करणाऱ्या करयुगुलाप्रमाणें भासतात. ओसाड माळावर फुलून सुगंधाची वाऱ्यावर खैरात करणाऱ्या फुलांचे हे दोन उसासे आहेत असें वाटतें.

खलांच्या कृतीची चीड येणारा, विपरीतार्थ काढणाऱ्या टीकाकारासमोर दंड थोपटून आव्हान देणारा, समर्थभक्त, स्फूर्तिदायक ऐतिहासिक गीतें गाणारा, सौंदर्यसमीक्षक, बाललीलांत लोभणारा, ' शैवालानें झांकलेल्या विहिरी ' प्रमाणें अगतिक परतंत्र जीवाचे गूढ संदेश कळविणारा, अदृश्य प्रेक्षकांप्रमाणें प्रेमी जीवाच्या दुःख-कहाण्या व सुखस्वप्नें तन्मयतेनें वर्णणारा कवी यशोगंधांत दिसत असल्यामुळें हा संग्रह यशोधनाप्रमाणेंच रसिक-प्रिय होईल यांत संदेह वाटत नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ...
मराठी ग्रंथ संग्रहालय

प्रस्तुत संग्रहांत बरींच चालीवरचीं गीतें आहेत. तेच तेच सूर कानांत घुमत असल्यामुळें हीं गीतें जन्मलीं असावींत. कदाचित् कविमनावर श्रोत्यांच्या अभिरुचीच्या झालेल्या संस्काराचा हा प्रत्याघात असेल. कांहीं कवितांवर रागांचा नामनिर्देश केलेला आढळेल. या बाबतींत, रागांच्या शास्त्रीय माहितीचें प्रदर्शन किंवा रागदारीवर कविता लिहिण्याचा हव्यास अगर नाटकांतील पदांच्या पंक्तीस कवितेस नेऊन बसविण्याचा इरादा या पैकीं एकहि कल्पना खरी ठरणार नाहीं.

यशवंत कवी या रागबद्ध कवितांसंबधीं एका खाजगी पत्रांत पुढीलप्रमाणें लिहितातः—

" त्या त्या कवितांची निर्मिती, जे सूर माझ्या मनांत घोळत असतांना झाली, त्या सुरांवरच त्या कविता गायिल्यानें त्यांतील भावना अधिकपणानें प्रचीतीस येतील अशी माझी समजूत आहे. एकाच वृत्ताला वा जातीला वा छन्दाला निरनिराळ्या चाली म्हणजे राग लावतां येतात. तेव्हां तें एकच कवन आलटून पालटून शक्य तितक्या निरनिराळ्या चालीवर गायिलें तरी आनन्दाची प्रचीति सर्व चालींनीं सारखीच होईल असें नाहीं. चाली—चालींत फरक असतो, म्हणजे रागाची भिन्नता असते. आणि राग-चालीची भिन्नता म्हणजे परिणाम—प्रभावांतही भिन्नताच. अर्थात् जो विशिष्ट भाव उद्गात्याच्या मनांत जागृत झालेला असतांना कविता जन्मलेली असते त्या विशिष्ट भावास अनुसरूनच सूर घुमूं लागलेले असतात. आणि त्या भावाला व सुरांना (म्हणजेच रागाला) अनुसरूनच शब्दही प्रगट होत असतात. अर्थात् त्याच भावाची रसिक श्रोत्याच्या मनाला साक्ष पटवून देण्यास, कवनांतील शब्द ज्या सुरांच्या संस्कारानें प्रगट झालेले असतात त्याच सुरांवर तें कवन गायिलें जावें, हें 'अधिकस्याधिकम् फलम्' या न्यायानें, विहित होय. आणि एवढ्याचसाठीं त्या सुरावटीला—चालीला कोणत्या रागनामानें ओळखिलें जातें तेवढें समजून घेऊन त्याचा उल्लेख कवितेच्या शिरोभागीं केलेला आहे. हेतु हा, कीं रागज्ञानी तरी त्यांना अनुसरून आनन्दाचा उपभोग घेऊं शकतील.

पदावर चाल देण्यांत तरी ह्याच हेतु नसतो का? माहितगार तेवढेच त्या चालींच्या चालीनें कवनांतील आनन्दनिधान हस्तगत करून घेतात."

'**जोडीदारास**' या गीतापर्यंत विषयवैचित्र्य आढळेल. पण त्यापुढील कविता भिन्नकाळीं स्वयंपूर्ण म्हणून लिहिल्या असूनही प्रेमी जीवांचीं सुखदुःखपर्यवसायी कथानकें वाटतील अशा कौशल्यानें मांडलीं आहेत. सूक्ष्म संगतीचे धागे जुळवून '**प्रियाराधन**' ते '**नदीचें मनोगत**' ही दुःखकथा वाचली तर यशोधनांतील '**चमेलीचे झेले**' व '**एक कहाणी**' यांच्या वाचनाप्रमाणेंच मन विषण्ण होतें. त्याचप्रमाणें '**अपरिचितेची ओढ**' ते '**एकरूपता**' ही काव्यमाला मनास प्रसन्नता आणून यशवंतांना सुखस्वप्नेंही चांगलीं रंगवितां येतात या विचारानें भावी यशाविषयीं मन निर्धास्त करते.

पुढील कवितांतील दुःखाची परमावधि पाहून सुखांचा काळ अजून लांब कां असावा अशी शंका मनांत डोकावते तोंच सुखाशेची रुपेरी कडा ढगावर चमकूं लागते. जगराहाटीबद्दल उपहास व्यक्त करून लोकांसाठीं कां होईना, पण हंसरा मुखवटा कवी तोंडावर चढवितो; सिद्धीच्या अपुरेपणांत, प्रयत्न व श्रम यांच्या साधनांत कृतकृत्यता मानतो; दुःखाचा विरंगुळा पाडणाऱ्या निष्पाप बालकांच्या सान्निध्यांत, मित्रकन्यांच्या लालनांत, प्रेमळ सुहृदांच्या सहवासांत, सुरवंटाचें फुलपांखरांत परिवर्तन व्हावें त्याप्रमाणें आपल्याहि निष्प्रेम जीवनाचें परिवर्तन करूं पाहतो.

**परी तुझें मंतरलेलें सदन शांतिपाठीं**
**त्यांत जरा नैराश्याचा दूर हो समंध**

आणि

**हा पांथ पातला पतंग भटकत कुठुनी**
**नेणार ना कळे कुठें प्रभंजन इथुनी**
**विसरेल काय परि इथें सुमन-रेणूंनीं—**
**जो दिधला त्यास दिलासा**

असे समाधानांचे निश्वास टाकतो, आणि शेवटीं परमेश्वरापाशीं—

**केलेत अनुग्रह ते न निकामी व्हावे**
**ते चढते फुलते मात्र अखंड रहावे**

एवढी अखेरची विनवणी करतो.

यशोगंधांतील कविमन रसातळांतून वर सुखाकडे आशेनें पाहूं लागलें आहे. दुःखमय भावगीतांचा कालखंड संपला. दुःखमय नाट्यगीतें, सुखस्वप्नांच्या स्वरूपांत दृगोचर होणारीं मनाचीं पुसट पण मनोहर प्रतिबिंबें यापुढील आयुष्यांत यशवंत गातील असें दर्शविणाऱ्या यशोगंधाचें प्रसिद्धीकरण कवीच्या वैयक्तिक जीवनांत व त्याचप्रमाणें काव्येतिहासांत खुणेचें प्रतीक ( Land-mark ) किंवा परिवर्तनबिंदू ( Turning point ) समजला जाईल.

'सुखी जीवनांत निर्मिती कमी होते ' हा जीवशास्त्रास व साहित्यास सारखाच लागू पडणारा सिद्धांत यशवंतांच्या बाबतींत तरी अपवाद ठरेल, आणि त्यांनीं नंतर रंगविलेलीं सुखी दृश्यें दुःखी पण रसिक मनाला जास्त मोहून टाकतील, अशी आशा बाळगणें चुकीचें नाहीं. जग दुःखाच्या भाराखालीं दडपून जाऊन, भीषण भवितव्यतेच्या निराशेनें लोकांचीं तोंडें काळवंडून गेलीं आहेत अशा वेळीं, सुखाचीं, आशेचीं, स्फूर्तिदायक, शांतिप्रद उल्हासगीतें कविमुखांतून यावींत अशी जगाची अपेक्षा आहे. शाश्वत कीर्ति मिळो न मिळो, स्वयंसमाधानासाठीं, सुखमय गीतें लिहिलीं जातील; ह्यातींत नाहींतर कधीं तरी, कोणी तरी कुठें तरी एकादें गीत वाचून किंवा ऐकून स्वतःचें दुःख क्षणभर विसरेल, एवढी अल्प महत्त्वा(?)-कांक्षा, शांतीच्या या प्रेषिताची असेल अशी सदिच्छा करणें अनाठायीं होणार नाहीं.

गेल्या सहा वर्षांत सर्व जगांत, हिंदुस्थानांत, कवीच्या आणि कविमित्रांच्या क्षुल्लक आयुष्यांतही अनेक संक्रमणें घडून आलीं. दीर्घ रात्री संपून वसंताचा मार्ग खुला करणारें संक्रमण डिसेंबरमध्यें होऊं लागल्यापासून

१४ जानेवारीचें पुराणकालीन संक्रमण विफल झालें आहे. स्वप्नांतच सत्यत्व भासविणाऱ्या आठवणींचे दुःखाश्रु एका हातानें पुसून, भावी आयुष्य सुखमय करण्यासाठीं दुसरा हात पुढें करणाऱ्या व्यक्तीला ( ३१ डिसेंबरला ) आपण शांतिः पुष्टि स्तुष्टिः असा आशीर्वाद मनःपूर्वक देऊन मैत्रीचीं तुटलेलीं बंधनें जोडून वर्षाची अभंग व अखंड सांखळी बनवूं पाहतों. मग या दिवशीं यशोगंधसंग्रह हातावेगळा करून भावी आयुष्य निराळ्या पण सुगम आल्हादकारक मार्गानें कंठून नवीन प्रदेश दाखविण्यास सरसावलेल्या कवीला रसिक वाचक अडथळे न आणतां उलट प्रोत्साहनच देतील असा भरंवसा कवीनें कां धरूं नये ?

गत-भावी आयुष्यांतील संधिकालाप्रमाणें, आल्हाददायक ऊन-पावसाप्रमाणें यशोगंध–यशवंतांचा काव्यपरिमळ–रसिकांना रुचेल अशी आशा प्रदर्शित करावीशी वाटते.

सुवासाचा नमुना दाखवावा एवढ्याच सद्धेतूनें पाकळ्या किंचित् उकलून दाखविण्याच्या खटाटोपानें कलिका व लतिका दोघेहीजण दुखावून त्यांच्या रोषास पात्र होणाऱ्या, त्याचप्रमाणें अधीर रसिकांच्या कृपाप्रसादास पात्र होण्याचें संकट टाळूं पाहणाऱ्या भृंगानें उन्मीलनाची वाट न पाहतां जीवानिशीं पळ काढणें हेंच शहाणपणाचें ठरेल.

३१ डिसेंबर १९३४,<br>
हिंदु कॉलनी, दादर,<br>
मुंबई.

**श्रीधर बाळकृष्ण रानडे**

# पुष्पसमर्पण

मम सुमन कुणा हें वाहूं कमलावरा
जरि कुणी शिरीं धरिल ह्या तरी प्रफुल्लता ये भरा.
या रङ्गच कोणी म्हणतो नच चाङ्गला
कीं डौलच कोणी म्हणतो न दिसे भला
कीं गन्धच कोणी म्हणतो न रुचे मला
ह्या अवगणनेनें पडति घरे अन्तरा ॥ मम० ॥

करि निन्दा कोणी ' शुद्र न याची कुळी '
क्षणभङ्गुर गणुनी घेच कुणी ना मुळीं
उपयुक्तपणा तर याचा कोणी तुळी
करि निकष जगाचा भाविकतेचा चुरा ॥ मम० ॥

गिरि—गोवर्धन तो सहज तुम्ही तोलिला
पूतना—स्तन्य वा प्याला हालाहला
तर तुम्हीच मग ह्या घ्या हो माझ्या फुला
हो मलिन विमल, हा प्रभाव तुमच्या करा
मम सुमन कुणा हें वाहूं कमलावरा ?

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. का. म. ७१७३
ता. २८-११-१९७३
मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र.



## अन्य नको वरदान

अन्य नको वरदान
प्रभो, मज अन्य नको वरदान

कोणी अंवती-भंवती माझ्या
जमले किंवा जमवियले ज्यां
पुरवायातें त्यांच्या गरजा
द्या सामर्थ्य निदान
प्रभो, मज अन्य नको वरदान.

कोठें चिमणें बालक रडतें
कोठें शोकीं कुटुम्ब बुडतें
त्वरित तयांना रिझवायातें
द्या मजला अवधान
प्रभो, मज अन्य नको वरदान.

जरी विसम्बुन या बाहूवर
कुणी बिलगला दुर्बल जर्जर

तो नच व्हावा वञ्चित रतिभर
इतुकें द्या अवसान
प्रभो, मज अन्य नको वरदान.

नरकीं पिचती बन्धू-भगिनी
सजती त्यांच्या जे उद्धरणीं
द्याच तयांस्तव स्फूर्ति मन्मनीं
गाया प्रेरक गान
प्रभो, मज अन्य नको वरदान.

तसाच येतां प्रसङ्ग बाका
'अहो, उठा जन लज्जा राखा'
अशा दशदिशीं फुटतां हाका
द्या हातांत कृपाण
प्रभो, मज अन्य नको वरदान.

घावा मागुनि घाव बैसुनी
देह शोणितें निवतां न्हाउनि
विह्वळतां जन भंवती मरणीं
न चळो धैर्य इमान
प्रभो, मज अन्य नको वरदान.

२-५-१९३३

# तृषा-निवारण

[ जाति - दिण्डी ]

नभीं होता खरखित सूर्य माथां
तृषा कासाविस करी तरुण पान्था
नसे पाणी मृगजळाविना कोठें
ठायिं ठायीं ते रूक्ष वृक्ष मोठे

एक कुणबी शेतांत झोपडीचें
राज्य अपुलें चाल्वी गरीबीचें
रुन्द लङ्गोटी, अङ्ग सुरकुत्यांचें
तेज देहीं तेथल्या जमीनीचें

झोप सरली, पाहतो तों उठून
तहानेनें जाऊन व्याकळून
कुम्भपात्रीं परि थेम्बही न पाणी
तृप्त-तृष्णा परि पथिक ये दिसोनी

क्रोध आला क्षणिं, परी लया गेला
वाटसरुच्या पाहतां तजेल्याला
वाटमार्गीं तो,-कल्पना न त्याला
तृषित जागा कीं कृषिक असे झाला

मनीं कुणब्याच्या दाटला उमाळा
हाटकुन तो थाम्बवी प्रवाशाला
तोण्ड कुरवाळुनि चुम्बुनी तयाचें
करी वारण तो आपुल्या तृषेचें.

# स्वभाव-धर्म

[ जाति — गोविन्द ]

कोकिळे ! स्वागत कां करिसी ?
स्वभावेंच जो येई जाई कशास हें त्यासी ?

नदी वाहते, ती का सागर बोलावी म्हणुनी ?
स्थिर न राहवे म्हणुनि धावते ती रानोरानीं.

घोस फुलांचे वेलीवर, तरु पालविनें नटले
का इतरांस्तव ? अदम्य यौवनविलास हा उसळे !

थयथय हें बेहोष नाचतें कारन्जें पाही
कुणावरी निज तुषार पडती दाद न त्या कांहीं !

सुखदुक्खानें हृदय जेधवां भारावुन जाई
खुलें कराया फक्त तेधवां येति आप्त भाई

पहा पाहिजे तर आळवुनी हेंच अवेळीं गान
'-कोण कोकिळा क्षुद्र कोठली-' त्याला काय गुमान ?

तूं देखिल छे त्यांतलीच ! मग मौन कसें धरशील ?
वसन्तोत्सवीं गात राहणें हेंच तुझें मुळि शील.

२-४-१९३३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थळ प्रत
सं. ५१०५न. ५५०३
ता. २८-१-१९३८

# क्षुद्र जीवजन्तूस

[ चाल – “प्रतिकूल होइल कैचा०” ]
या पदासारखी

अगा जीवजन्तो ! येई कींव तुझी क्षुद्रा !
साठलेलें साण्ड-पाणी
त्यांत तुझी रास-न्हाणी
तुवां साङ्ग का रे कधीं पाहिलें समुद्रा ?
आरोहूनि लाटांवरी
विहरला दिगन्तरीं
तयालाच रत्नाकरातळीं शेज निद्रा
उडे उन्च आकाशांत
व्याध तया विन्धितात
वीर-मृत्यु-भाग्य टोळा कोठुनी अभद्रा ?
वसे निवडुङ्गामाजी
घाणींत जो सदा राजी
शिकारी न शोधी त्यातें, धुण्डितो मृगेन्द्रा
गाजला जो शौर्यवन्त
तयालाच दिव्य अन्त
पतनींहि नक्षत्रांची प्रेक्षणीय मुद्रा

सोलापूर
१२–२–१९३४

# तमाशा

[ गज्जल — वसन्त ]

जगीं या द्वेषदम्भाचा तमाशा माजला सारा
मुलामा मान्यता पावे, गुणाला लाभते कारा !

इमानें कष्टतो त्याला मिळेना अन्नही पोटा
परन्तू नीचतेसाठीं मिठाईचा सदा चारा.

मिळाव्या स्वाभिमानाच्या सदा शीर्षावरी लाथा
करी जो सारखी हांजी तया तख्तापुढें थारा

जयाच्या विक्रमें टेम्भा स्वताचा जाळिती त्यातें—
तळीं गाढून हे शेखीं स्वताचा दाविती तोरा

नगारा ज्याचिया द्वारीं बढाईचा सदा गाजे
ठरे कर्तृत्वशाली तो, तयाला घालिती हारा.

स्वकर्मीं चूर जो मौनी कुणाच्या येइना डोळां
त्यजोनी धान्य, भूसाला दिगन्तीं नेतसे वारा

१६-२-१९३१

# कोणाचे आम्ही कोण

[ जाति — बालानन्द ]

कोणाचे आम्ही कोण   अम्ही जगाचे दिक्कोन !
ब्रह्माण्डाभवती बुरुज   हे दण्डचि अमुचे उमज
ब्रह्माण्डाभवती वेढे   घाली जें भोळें वेडें —
अम्हीच तें अञ्जनिबाळ   काळाला झालों काळ
माण्डियलें आम्ही ठाण   जगदुद्धारास्तव जाण !

ही पूजा अमुची आम्ही   माण्डावी अन्तर्यामीं
'व्यापारी विश्वच बनलें   आम्हांला मोल न उरलें
जगताच्या बाजारांत   कोण्ड्याहुनि आम्ही स्वस्त
मग बोला 'आम्ही कोण'?-   शून्यामाधिं मोठें शून्य !

कोणावर रागेजावें ?   प्रेमाचीं कोठें गांवें ?
प्रेमाचें ठाणच उठलें   कोण कुणाचें मग कुठलें ?
प्रेमाची वसती नसता   कोणावर फुगतां रुसतां ?
देवघेव कांटेतोल   प्रेम त्यांत पुरलें खोल.

कवटाळुनि ज्यांना त्यांना   मानियलें 'दादा - नाना'
' माधुकरी मागुन यावें   जेवाया यांना द्यावें

या सर्वस्वाचा साज मागणें न मुद्दल व्याज
असल्या व्यवहारामाजी मित्र आप्त सारे राजी
साधाया केवळ स्वार्थ आण-भाक देतिल बात !

वचनांच्या बरसातींत वाटल्यास व्हावें तृप्त
बोलाचा शिजतो भात त्यावरि मारावा हात
वचनांच्या फुलती वेली करावया मानसकेली
वचनांचीं नक्षत्रें हीं मोदानें दुरुनी पाही
वचनांचे माणिकमोती कागदीच टिकल्या ठरती
तीं वचनें केवळ गारा चिमटींतिल किंवा पारा

वचनांचीं धरणें आशा कारण होणें निज नाशा
आशेवर होतां स्वार कायमचें होणें ठार.
आशेची घोडा-गाडी पायाविण जणुं ती माडी
मातीचे बेन्दुर-बैल शेत कसे नाङ्गरतील ?
पृथ्वीच्या चित्रावरती वसणारा गणणें नृपती
तंव वचनीं विश्वसणारा वाऱ्यावरि तो जगणारा

साधाया केवळ स्वार्थ देति हात हातीं आप्त
आप्तांचें अमुच्या सैन्य वाढवितें अमुचें दैन्य
मित्रांची अमुच्या फौज मग बघते दुरुनी मौज

आम्हांला जगण्यासाठीं वाव कुठें पृथ्वीपाठीं ?
आप्तगोत व्हाया अमुचें हृदय रक्त ना एकाचें.

कोणाचे आम्ही कोण ? शब्दांमधि आम्ही ‘ होन ’
परि न अम्ही चलनी नाणें शिवराई-मोलें जाणें
देव्हारे अमुचे जगतीं माजतील मेल्यावरती
उभारुनी दगडी पुतळे नाचतील पुढती सगळे
सभोंवती धरतिल फेर आज परी करती जेर
वाभाडे काढायाला वाघनखें त्यां हातांला

आम्हांला मानुनि चोर चोरांना गणती थोर
परक्यांवर कौतुकवृष्टी तुच्छताच आम्हांवरती
परक्यांना मलिदा देती परि कळणा अमुच्या पात्रीं
पापास्तव दोषी आम्ही पुण्य घेति अपुल्या कामीं
विपदेला मालक आम्ही धनधान्या परि ते स्वामी

बाबांनो, कां रे ऐसें ? नुमजाना कोणां कैसें ?
कोणावरि तुमच्या गमजा विवेक चित्तीं हा उमजा
रुधिराश्रूंमधुनी अमुच्या शान्ति-सुधा-सरिता तुमच्या
साण्डियला आम्ही घाम म्हणुनि तुम्हां मौक्तिकदाम
आमुचिया निश्वासांनीं जगतांतिल गेल्या घाणी
आमुचिया उद्गारांनीं दावियल्या चित्सुख-खाणी

उमजुनि हें चित्तीं पुरतें   अवमाना आम्हां परतें !
परि झांकुनि डोळे, लाथा   देउं नका अमुच्या माथां
जरि जाणिव ही ठेवाल   मग आम्ही सोसूं हाल
कोटि योनि मार्गीं तुमच्या   पायवड्या वाळूं तनुच्या
परि 'आहों आम्ही कोण'   हेंच कथावें लागो न.

कराड
२८–१२–१९२२

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वत्व प्रत
सं. १८५१ नं. ९१०४
ता. २५।१।२३
आ. अं.

# मातृभोजन

[ उपनयन-समारम्भाच्या पूर्वी मातृभोजनाचा एक सोहाळा असतो. त्या प्रसङ्गीं वटूच्या आईच्या अन्तःकरणांत अशाच प्रकारचा भाव हेलावत असेल. ]

( ओवी छन्द )

कोटरींच्या पिलां-मुखीं घास घालिते चिमणी
चारा चोचींत आणुनी.
पङ्ख फुटे पावेतों ती माय भरविते परी
जाती मग पिलें दुरी

तुझें शैशव सम्पलें, पङ्ख फुटले तुलाही
विद्यादेवी तुला बाही.
उन्च जाई, होई बाळा गुण-शील-विद्यावन्त
ध्वज डोलूं दे दिगन्त.

परि थाम्ब कीं राजसा माझ्या अङ्कीं जरा बैस
भरवुं दे तुला घास
शैशवाच्या सीमेवरी माउलीचा एक घास
देवो अखण्ड उल्हास.

२९–५–१९३४

# मातेस

[ जनतेच्या अभिरुचीप्रमाणें जोंपावेतों लेखक लिहीत असतो तोंपर्यन्त जनता त्याचा गौरव करीत असते; त्याला डोक्यावर घेऊन नाचत असते. पण तिच्या अभिरुचीच्या मर्यादा ओलाण्डल्या गेल्या कीं तीच जनता त्याची निर्भत्सना करते, त्याला पायातळीं गाडूं पाहते, भर चव्हाठ्यावर त्याच्या कृतीची किंवा आकृतीची चिता रचते. खरें पाहूं जातां, आपल्या एका कृतीचें कौतुक करणारी जनता, आपल्या नवीन कृतीचाही सहानु-भूतिपूर्वक स्वीकार करील अशी, इमानानें परिश्रमपूर्वक कार्य करणाराची अपेक्षा असते. आणि रसिक जनतेनें आपल्या आवडीनिवडीच्या सङ्कुचित चष्म्यांतून न पाहतां लेखकाच्या भूमिकेशीं समरस होऊन, लेखकाच्या पातळीवर येऊन, निर्लेप मनानेंच त्याच्या कृतीचा विचार करावा—आस्वाद घ्यावा असें शास्त्रही साङ्गतें. परन्तु वरेच वेळां अनुभव विपरीत येतो. व तोच ह्या कवितेच्या मुळाशीं आहे. ]

[ जाति – प्रणयप्रभा ]

तुजविषयिं अन्तरीं प्रेम जरी
वाटते निरन्तर भीति परि !

मिरविलेस मज कडे घेउनी
चालविलेसहि बोट धरूनी
आणि झपाझप प्रगती बघुनी
भरतेंहि तुझ्या दाटलें उरीं
वाटते निरन्तर भीति परि !

चिन्ध्यांचीं बनविलीं बाहुलीं
काड्यांचीं घरकुलें उभविलीं
तळीं किती खळग्यांत निर्मिलीं
केलींस कौतुकें परोपरी
वाटते निरन्तर भीति परि !

बघुनि तुझें वात्सल्यसरोवर
प्रसन्न त्यावर लहरी सुन्दर
होउनि पोटीं प्रहर्षनिर्भर
व्यापार नवे घेतले करीं
वाटते निरन्तर भीति परि !

क्रीडा सरल्या अतां पोरकट
देह लागला व्हाया राकट
पराक्रमास्तव करितां खटपट
कां अठी कपाळावरी तरी ?
वाटते निरन्तर भीति परि !

तुझ्या रुचीची सीमा'सरतां
धारण कीं करशील रुद्रता
वात्सल्याचा कुंभ तव रिता

होईल अचानक काय तरी ?
वाटते निरन्तर भीति परि !

तुझ्या रुचीची लावुनि झापड
नाविन्याची दडपुन आवड
तीच तीच कां वाहूं कावड ?
का ध्येय तुझें हें खरोखरी !
वाटते निरन्तर भीति परि !

कुरवाळुनि मज पुन्हां जवळ घे
भाळावर जो घाम थबथबे
तो आशेनें तुजकडे बघे
श्वासेंहि नवें चैतन्य भरी !
तुजविषयिं अन्तरीं प्रेम जरी.

८-१०-१९३३

---

# आज्ञाभङ्ग ?

[ मन्दारमाला ]

लाहीपरी होय खालीं-वरी जो मुलां सौख्य लागावया सन्तत
तो जीव आई, तुझा अन्ति होता पुरा जाहला लोचनीं बिम्बित
माझा अभागीपणा देखुनीया निवारावया बोध केला तुवां
डोळे क्षणीं आणि झांकून आई असा तोडिला लोकिचा या दुवा.

आई, तुझे बोल माझ्या सुखार्थी जरी कर्णरन्ध्रांत ते नादती
त्वा काढिले अन्तकाळीं म्हणोनी जरी तीक्ष्णतेनें मनीं डाचती
हा काळपर्यन्त हातून माझ्या परन्तू न तैशी कृती जाहली
मानू नको पाठिमागें परन्तू मुलांनीं अवज्ञा तुझी माण्डली !

संसारनौकेंत जे सोबती हे तयांचींच आधीं सुखें साधतां
नाहीं मला भान माझ्या सुखाचें, पहाया न सन्धीहि तें तत्वता
सह्याचलातुल्य ह्या सिन्धुलाटा प्रकोपें भिडूं अम्बरा पाहतां
माझ्या सुखाची बघूं सोय आधीं ? तयांची करूं आधिं कीं मुक्तता !
सौख्यांश लाभावया होम व्हावा दुजाच्या सुखाचा असा योग हा
द्यावी स्वसौख्यावरी लाथ; देई परित्याग सन्तोष मातें महा.
माझ्या सुखाचा, म्हणोनीच आई, जरी बोल तूझा न मी पाळितों
आई, तुझ्या दिव्य निःस्वार्थतेचा न हा काय मी मार्ग चोखाळतों ?

---

# रङ्काचें वैभव

[ दिण्डी ]

कुठें पोटास्तव कष्ट उपसुनी मी
श्रान्त येतों जों दिनान्तीं स्वधामीं
किती आनन्दें बिलगतात बाळें
आणि वत्सल लाविती कुणी डोळे.

गरज़ कोणाची, छन्द वा कुणाचे
कुठें आहे सामर्थ्य पुरविण्याचें ?
तरी करितों मी फसवणूक त्यांची —
कूस जितुकी माझिया शक्यतेची.

तरी वाटुन त्याचीहि अपूर्वाई
रोज माझ्या हे बघति सौख्य-सोयी
मीच जणुं कीं देवाधिदेव त्यांचा
नसुन अल्पहि बडिवार पामराचा.

सर्व परिंनीं प्रभुवरा तूच शास्ता
असे केवळ तव दीन मी गुमास्ता
श्रेय माझ्या वाट्यास मात्र येतें
वानुं तव या किति कृपावैभवातें !

२९-७-१९३२

# शापित नक्षत्रें

[ अभङ्ग ]

दिलींस कशाला रत्नें हीं दयाळा ?
मज कङ्गालाला काय त्यांचें ?

रुळावें जयांनीं नृपाङ्गना-कण्ठीं
अथवा किरीटीं सम्राटांच्या

तयांनीं माझिया घरांत केरांत
काय धूळ खात खितपावें ?

पुरवाया कोड कौतुक तयांचें
वैभव चिन्ध्यांचें मात्र माझें.

कराया कोन्दण खापरीवाचून
काय मौल्यवान मजपाशीं ?

२

शापित नक्षत्रें वाटतें दयाळा
घातलीं जन्माला माझ्या गेहीं.

काय गा तयांच्या वनवासासाठीं
रङ्काची खोपटी योजिली ही ?

होय धनुर्धारी डोम्ब डोम्बा-घरीं
दुसरी चाकरी काय तेथें ?

सङ्गतीनें त्यांच्या झालों भाग्यवान्
परि शरमून जीव जाई

होते पदोपदीं हेळसाण्ड त्यांची
जाणीव ही जाची नित्य मना.

पुरे का न झाली त्यांची विटम्बना
काढा या सूर्यांना ढगांतून.

२५-२-१९३०

# झाल्या तिन्हिसाञ्जा

[ शेतकीपेशांतील घरधनिणीचें साञ्जगीत ]

अजुनि कसे येती ना परधान्या राजा ?
किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्हिसाञ्जा !

उशिर होइ काढाया गाईच्या धारा
शालु हिरा कालवडी देती हुङ्कारा
टवकारिति कान जरी वाजे दरवाजा
किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्हिसाञ्जा !

वाट तरी सरळ कुठें पान्दींतिल सारी ?
त्यांतुनि तर आज रात्र अन्धारी भारी !
आणि बैल कसल्याहि बुजती आवाजा
किरकिरती रातकिडे झाल्या तिन्हिसाञ्जा !

'जेवणार मी पुढ्यांत घाली मधु रुञ्जी
झोपेनें पेङ्गुळली तरि न निजे मञ्जी
आणि किती करनि आंत - बाहेरी ये - जा
किरकिरती रातकिडे झाल्या तिन्हिसाञ्जा !

निवल्यावर हुरड्याच्या   उसळीस न गोडी
त्वकर कां सोडिती न   मोट तरी थोडी
अधिकाधिक खालीं-वर   होइ जीव माझा
किरकिरती रातकिडे,   झाल्या तिन्हिसाञ्जा !

गुरगुरला तो पिसाळ   काल जरा कांहीं
म्हणती त्या मेल्याला   काळिज कीं नाहीं !
परि पाठीराखी ती   आहे अष्टभुजा
किरकिरती रातकिडे,   झाल्या तिन्हिसाञ्जा !

चाफळ
१६-४-१९३३

परधान्या राजा : बैलजोडी
शालु व हिरा : दोन कालवडी
मधु व मञ्जी : चिमणीं बाळें.
पिसाळ : शिवारांतील शेजारी.
अष्टभुजा : कुलदैवत.

## अभिनय-पटूस

अभिनयीं चातुरी तुझीच जादूगारा
जादुची उभविसी सुखद मनोहर कारा

सापडती ज्यांना बोल न भाषेमाजी
उसळतीं अशीं जीं अन्तरांत कारञ्जीं
अभिनयीं दाविसी तीं तू सहजासहजी
छेडिसी हृदयिंच्या तारा.

शब्दास लाभला नव्हता जन्महि जेव्हां
विक्षेप अङ्गिचे सहजीं स्फुरुनी तेव्हां
हृदयांनीं हृदया निवेदिले निज भावा
ह्या पटविसि साक्षात्कारा.

जणु तरङ्ग सिन्धूपृष्ठीं म्हणजे वाचा
परि तरङ्ग नोहे अवघा सागर साचा
का अपरम्पारा पुरेल केवळ सांचा
अपुरा हा शब्दपसारा.

ही कितीक अर्थी मान लचकते, किंवा —
हे नयन नाचती, ओठ हालती, किंवा —
कटि, कपोल, बाहू, पदन्यास हे किंवा
यांपुढें न शब्दां थारा.

ह्या वेली जैशा लवथवती कुसुमांनीं
ही रजनी फुलते अनन्त नक्षत्रांनीं.
अभिनयीं तेवि तनु जाइ तुझी मोहरुनी
ये निर्वच सुख सामोरा
अभिनयीं चातुरी तुझीच जादूगारा !

१७-८-१९३१

# आत्माहुति

देतांना सेनापतीनीं माहुताबरोबर
पाठविलेला निरोप.

[ गजल – पाण्डव ]

पाङ्गलें हें सैन्य सारें केवि झुन्जूं एकला ?
आयुधें झालीं निकामी, जीव आला टेकिला

प्रान्त पादाक्रान्त केले आणि आलों जों पुढें
माजली मागें फितूरी कोण्डमारा जाहला.

ज्यांवरी निर्धास्त होतों सर्वथा विश्वासुनी
जाहले ते पाठमोरे, पूर्ण दावा साधिला !

वज्रसम्पातापुढेंही राहिला दुर्भेद्य जो
सङ्कटींचा आसरा जो कोट तोही भङ्गला !

आणिले शाबूत ज्याला झेलुनी हल्ले उरीं
सावराया या निशाणा हात कापूं लागला

राहिना हत्ती उभाही आणिबाणी ठेपली
माहुता ! गर्दींत तेव्हां साङ्ग घोडा घातला

आणखी हें साङ्ग भूपा, " मागुती येण्याहुनी
आहुती सेनापतीची मङ्गला होवो तुला "

७-४-१९३०

# सैनिकास

[ जाति – प्रणयप्रभा ]

अम्बरीं सञ्चरे जरी विमान
सोडी न सङ्गरीं धैर्य इमान

आ वासुनिया इकडे तोफा
सङ्गिनिंचा तो तिकडे ताफा
प्रमत्त घोडे झाडिति टापा
शूरा त्यांची काय गुमान ?

ठायीं ठायीं माण्डुनि ठाणीं
शत्रु सज्ज जरि शस्त्रास्त्रांनीं
शौर्याची ती तुझ्या निशाणी
समज तुझा तो बहु सन्मान.

मरणावाचुनि नच गत्यन्तर
मरण्याहुनि रे अन्थरुणावर
शूरा काय न मङ्गल सुन्दर
मरावया स्थळ रण-मैदान ?

क्षुद्र समजसी स्वतास का तू ?
क्षुद्र कुडी, नच धर्म परन्तु !
स्वराष्ट्रधर्मी दिव्य तुझा क्रतु
निर्मिल योद्धे पानोपान.

येरवडा
९-४-१९३०

# विमानांतून पुष्पवृष्टी

[ दिण्डी ]

" विमानांतुन जाहली पुष्पवृष्टी "
पुराणींची ती पुराणांत सृष्टी.

पारध्याच्या जाळ्यांत गुन्तलेले
विहङ्गांचे दुर्दैवलीन मेळे
नभीं जाळ्यासह उडायास जेथें
एकवटुनी झटतात तोंच तेथें
शिरीं त्यांच्या अग्न्यस्त्र फेकण्यातें
विमानें हीं उडविती आज जेते !

पाखरांनो, म्हणुनी न धीर सोडा
तुटुन जाइल एकेक झिजुनि तोडा
सान टिटवीनें सिन्धु आटवीला
काय लोकीं दुस्साध्य यत्नशीला

असो सैतानी शक्ति केव्हढी ही
न्याय्य यत्नान्तीं रसातळीं जाई
आणि विजयी शेवटीं व्हाल जेव्हां
हेच जेते ( जरि पराभूत तेव्हां )
हसत येउनि ( अन्तरीं असुनि कष्टी )
विमानांतुन करतील पुष्पवृष्टी.

१५-४-१९३०

# सत्य न मरतें दळभारें !

[ जाति – प्रणयप्रभा ]

तव यशा आणिती लाञ्छन रे
लाडकीं सकल हीं तव पोरें

पूर्ण आन्धळा तू धृतराष्ट्रा
बान्धी गान्धारी निज नेत्रां
पुरें फावलें सहजीं पुत्रां
उधळाया निज गुण सारे.

भीमाचें बळ उसळ्या घेतें
धर्म घालितो लगाम त्यातें
म्हणुनि काय या शान्तिघनातें
दावावीं कारागारें ?

गुलाम झाली द्रुपदसुता ही
म्हणुनि हिला का लाजचि नाहीं
हिच्या हिसकती निरीस पाही
इभ्रतिचें पिउनी वारें.

हाक सतीची कोटि मुखांनीं
फुटते, परि ती यावि न कानीं
यास्तव भंवती तुझ्या सुतांनीं
बन्द गमे केलीं दारें !

दिसे न, ऐकुं न ये, परि न कळे –
कीं सिंहासन तुझें डळमळे ?
आवर बाळें, थाम्बवि चाळे,
सत्य न मरतें दळभारें !

येरवडा
३-७-१९३०

# इतुकें का सोपें रे ?–
# बन्ध तोडणें !

[ " रूढीचे पाश झुगारून दिले पाहिजेत," " बन्धनांच्या पलीकडे गेलें पाहिजे " अशी घोषणा ऐकूं येत असते. आणि ती गैरवाजवी आहे असें कोण म्हणेल ? परन्तु नुसत्या घोषणेनें हुरळून जाण्याइतकी तिची अम्मल-बजावणी सुकर नाहीं. वाणीचें रूपान्तर करणींत करूं जातांना अनेक अकल्पित अडचणी उद्भवतात आणि त्यांची गुन्तागुन्त मतीला कुण्ठित करते. मोहक शब्दपङ्क्तीची झूल अङ्गिकारतांना भयङ्कर दिव्यांतून पार पडण्याची तयारी ठेविली पाहिजे ]

[ कवाली ]

इतुकें का सोपें रे बन्ध तोडणें ?
बन्ध काय हार गळां ? काय लोडणें ?

तू साखळदण्ड थोर
तोडशील करुनि जोर.
गुरफटतां शैवालीं कठिण पोहणें !

तोडशील वृक्ष एक
खोल मुळ्या परि अनेक
उठवितील वे-काहुर धरुनि नव जिणें.

मराठी यशोगन्ध ग्रंथालय
क्र. नं.
ता.

श्वापद तू घोर वनीं
नमविशील निज चरणीं
परि उठतां मोहळ का तुज निभावणें ?

एकच कळ दावताच
कितिक भुतें करिति नाच
देउनि सकलांस तोण्ड केंवि झुन्जणें ?

[redacted]

एकाची कितिकांना
कळ येइल ही गणना
नच जोंवरि तोंवरि का व्यर्थ डिवचणें ?

वाळूंच्या वावटळी
होइ गिळायास बळी
तरिच कांहिं लाभतील तुज यशोधनें !

१०-१०-१९३३

# सेवा-वृत्ती

[ जाति — कोकिळा ]

सेवा-वृत्ति करी हैराण !
मिरवी वन्दी-जनीं बढाई
वाक्य शिवीविण पुरें न होई
रणाङ्गणीं परि करि न चढाई
भ्याड धन्याची सेवा म्हणजे नरकीं कुजणें जाण.

स्वत्वहि विसरी स्वार्थासाठीं
परहित होतां भाळीं आठी
सहाय्य ओठीं, विरोध पोटीं
कृपा-प्रसादहि अशा धन्याचा जहराच्याच समान.

जरी इमानी विशेष नोकर
जोखड मानेवरी निरन्तर
मरो उपाशी, — नाहीं खातर
मोबदल्याला रती पाव रति; — सढळ असे परिमाण !

तीव्र गदेनें सेवक विठ्ठल
बघुन म्हणे ‘ हें ढोङ्गच केवळ ’
आपण कुसळानेंही व्याकुळ
धनी न तो हैवान जयाला जाणीवेची वाण.

वसतीस्तव अन्धार-कोठडी
खुल्या हवेची आस बावडी
डोळ्यावरती नित्य झापडी
असल्या सेवा-वृत्ती-माजी गोळा होती प्राण.

विश्व गर्जतें क्रान्ति-घोषणा
नाद न येऊं देती श्रवणा
आणि बान्धिती मुसक्या वदना
अशा जिण्याहुन फारच बरवें वाळवण्ट वैराण !

जानेवारी १९३०

# विपरीत रीत

[ अङ्गीकृत कार्यावरील ममत्वामुळें, सङ्कटकाळीं त्याचा त्याग करणें जिवावर येतें. अशा वेळीं त्याच्या बचावासाठीं सकृत् दर्शनीं विसङ्गत वाटणाऱ्या मार्गाचा अवलम्ब करावा लागतो. प्रचण्ड लाट उसळून चालून आली असतां स्वस्थानावरून च्युत व्हायचें नसेल तर ताठर वृत्तीच कायम ठेवून चालत नाहीं. लाट अङ्गावरून जाईपर्यन्त पाण्यांतच बुडी देऊन राहावें लागतें— तरच मान वर काढतां येते. ]

ही प्रेरक मज माझीच प्रीत
कधि वरिते जरि विपरीत रीत.

न्हाउं घालुनी सौगन्धानें
दिव्य चढवुनी रत्नभूषणें
नटवी अपुलें तान्हें चिमणें
लावि शेवटीं माय तीट.

भुईमुगाचे वेल बहरले
स्वयेंच फिरुनी भुईंत रुजले
फलद्रूप ते तरिच जाहले
हीहि निसर्गाचीच रीत.

वट-वृक्षाच्या पारम्ब्यांनीं
पयोदांतल्या जल-धारांनीं
अधोगतीतें अङ्गिकारुनी
न ही शिकविली काय नीत ?

भव्य उभविल्या राजवटीला
जाउं देउं का रसातळाला ? —
व्यसनीं सेवुंहि वनवासाला.
ल्वति ल्व्हाळे महापुरांत !

येरवडा
१४-७-१९३०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५३६८

# धरा हो अन्त्यजां हातीं !

[ गज्जल – वसन्त ]

अरेरे, केव्हढी भ्रान्ती ! कशी ती जाग येईना ?
तळीं गाढून बन्धूंना कसें साधाल कल्याणा ?

पशूंना पाळुनी प्रेम कसें माण्डीवरी घेता ?
परी चाण्डाळ दाराशीं उभाही राहुं ना देता.

करावें आदरातिथ्या विधर्मी ते जरी आले
परन्तू बन्धुंना बन्धू स्वधर्मी पारखे झाले

निघालीं तीं पहा राष्ट्रें नभाला हात घालाया
इथें ही जातिभेदाची न येई कोण्डि फोडाया।

कडे घे अन्त्यजाचें जो दयेनें पोरकें पोर
स्मृती त्या एकनाथाची कशानें लोपली पार ?

जरी आत्मोन्नती व्हावी, दुजांची ती करा आधीं.
तळीं जो गाढितो लोकां स्वताचें वैर तो साधी.

कशाला रूढिचा चोथा अजूनी चावतां दातीं
कवाडे खोलुनी, प्रेमें धरा हो अन्त्यजां हातीं.

बडोदें
२०-१-१९३३.

## एक-दोघां विद्यार्थ्यांस दिलेला
# हस्तलेख

[ जाति – दिण्डी ]

उडुन वाऱ्यावर बीज-रेणु जाती
आणि सुफलित मग कुठें तरी होती
तवि सत्कृति वच कुठें तरि विरून
दिसुन येतिल कीं राहिले रुजून.

११-६-१९३४

# कुत्रा आणि आगगाडी

[ साकी ]

येइ उताराव्रती गाडी आणि थाम्बली थोडी
श्वान तेथलें लुडबुड करुनी लावी लाडीगोडी

धगधगीतपण लावण्याचें, सहवासहि उबदार,
तेंवि आर्द्रत उच्छ्वासामधिं, मोहवि त्या अनिवार.

सौदामिनिला परन्तु नव्हती त्याची कांहीं दाद
जडाजडाला नेणें त्यजणें हाच एक तिज नाद.

नादांतच त्या चालुं लागली सोडित फूत्काराला
तिच्यासङ्गतीं आणि लागलें श्वानहि धावायाला

बेगुमान बेफाम धावतां अधिकाधिक ती वेगें
तेंहि लागलें निकरानें तों धावूं तिचिया मागें.

काय तयाच्या अनन्यतेची परन्तु तिजला चाड
ताड - ताड ती तुडवित जाई कानन घोर, पहाड.

जीव तोडुनी पळतां पळतां श्वान बिचारें थकलें
'आ' वासुनि घायाळ होउनी हृदय दुभङ्गुन पडलें

'रूपगर्विता कुबेर कन्या काय भुले प्रेमास ?'
अशाच उद्गारांत तयाचा विरला सरता श्वास.

२६-८-१९३३

# शरीर-सम्बन्ध

[ सुनीत – शा. वि. ]

वाद्यें वाजवितां, जनें जमवितां, कां अक्षता फेकतां ?
साऱ्या सम्भवतात जेथुनि पुढें दुक्खासुखाच्या कथा —
साक्षीदार हवेत काय इतुके त्या ह्या विधीलागुनी ?
टाळ्या वाजविण्यास हा जमवितां गोतावळा लाम्बुनी ?

जोडाया, किति थाटमाट करतां, सम्बन्ध शारीरिक ?
सोपें क्षुल्लक कार्य हें उरकतां का मानितां सार्थक ?
कोठें दोन जुळावयास हृदयें उद्युक्त होता पण
त्वेषानें सरसावलात सगळे घालावयातें घण

आतां कांहि विचारपूस ? हृदयें आहेत जाग्यावरी ?—
कां तीं होतिल एकरूप सहजीं देतां करातें करीं ?
अग्नी घर्षणजन्य गेह सजतां ग्रासावयातें उद्यां
कामीं येतिल सान्त्वनास तुमच्या का आसवांच्या नद्या ?

ज्याची त्यासच आपुली मिळवुं दे दुक्खासुखाची खनी
सत्तेची लुडबूड गाजवुनि का शापास होतां धनी ?

२६-२-१९३४

# जोडीदारास

[ चाल – " आशिर्वाद " कवितेची ]

चल जरा सावकाशीनें, का इतुकी शीघ्र धाव ?
तू अबलख वाजी ' मोती '
गावठीच माझी जाती
परि एक धुरा दोघांची ! – दैवाचा काय डाव !

ही चढण केवढी पुढती
भरुन ये खूर ही छाती
धरुं कोठवरी मग कैचा तुजसङ्गें मी टिकाव ?

या तेंवि उतरणीवरती
वसरेल टाप ही भीति
तव ओढाताणीमाजी मम कैचा रे निभाव ?

तू पुढें आणि मी मागें
खिळखिळा होउं रथ लागे
बघतात पथिक हे मौजा; सोसवती ते न घाव !

तू अवखळ तल्लख असर्सी
जोडिलें मला तुजपाशीं
वाटते शरम मज याची; परि चाले ना उपाव !

विधि-घटना विषम जरी ही
नच हेतुविना परि कांहीं
दुर्बलास सामान्यांचा तारितसे का प्रभाव ?

वरदान लाभलें भाग्यें
परि तेंहि मिरविण्याजोगें
सामर्थ्य, लायकी, यांचा मजठायीं रे अभाव.

तव होइ या विजोडीनें
उत्साह-भङ्ग, मी जाणें;
परि साम्भाळुनि घे आतां, धरि कांहीं सौम्य भाव.

ना तरी समज सामोरा
अपघात ठेपला सारा
ठिकऱ्याच रथाच्या होतां मग कुठलें नांव गांव ?

२८-७-१९३२

# प्रियाराधना

[ साकी ]

ती कोचावर, तो तिजपुढती
वसला टेकुन गुडघे
प्रेमाचें भाण्डार आपुल्या
खुलें कराया अवघें

परोपरींनीं करि आळवणी —
" तुजवर मी अनुरक्त,
करितों धारण जीवित मी हें
तुझ्याच साठीं फक्त

करी अनुग्रह हृदयदेवते !
मी तव केवळ भक्त "

अखेर देउनि दीर्घ जाम्भई
निर्णय करि ती व्यक्त

१–४–१९३३

# राग-रङ्ग

[ चाल — " कठिण कठिण कठिण किती पुरुषहृदय बाई " ]
या पदाची.

तीः— लपत छपत येउनिया मारिसि पिचकारी
भिजविसि का तनुलतिका कुटिला ! मम सारी ?

तोः— चाल्लीस वेउनिया जें हिरावुनी
चतुरपणें निज पदराआड लपवुनी
सावपणा दावित वर ढोङ्ग आणुनी
हुडकुनि तें काढाया — पकडाया चोरी

तीः— गेलें मी अवचित कीं दचकुनी किती !
तोः— कळलें मज वनिं हरिणी केंवि दचकती.
तीः— गार तरी रङ्ग किती ! दुष्ट तव मती !
तोः— दुष्ट मी न : कोण पहा विलसे सहकारीं.

तोः— केसांतुनि रङ्गाचे थेम्ब निथळतां
पदर चिम्ब भिजुनि उरीं तेविं बिलगतां
चिडलेली नजर तुझी मजसि विन्धतां
यापरतें साङ्ग कुठें चित्र हृदयहारी ?

१६-३-१९३२

# परतुनी येणार नाहींस का ?

[ सुनीत – शा. विं. ]

तू आलास, परन्तु मी न उठुनी आलें तुझ्या स्वागता
तू आलास समीपही, परि न मी केलें वरी लोचनां
तू कांहीं वदलास आतुरपणें, मी मौन ना सोडिलें
तू कांहीं पुसलेंस, मी न दिधलीं तूतें सुधीं उत्तरें.

घ्याया मन्मनिंचा विकल्प कळुनी त्वां आर्जवीलें किती
भृङ्गा ही कलिका परी न खुलली गुञ्जारवानें तुझ्या
गेला तोल तुझा अखेर, चढत्या सूर्यापरी तापुनी
तू, माझ्यावर कोपुनी, नच कमी केलेंस वाक्ताडनीं.

शब्दानें मग शब्द वाढुनि तुला धिक्कारिलें शेवटीं
वीचीमागुनि वीचिका धडकती जैशा किनाऱ्यावरी.
होतां क्षुब्ध समुद्र तारु बुडतें, तैसेंच झालें पुढें; —
झाली भेट समाप्त ती; फिरविली त्वां पाठ माझ्याकडे.

अश्रू मन्नयनीं परन्तु जमले दारांत जातांच तू
घ्यानीं आणुनि ते तरी परतुनी येणार नाहींस का ?

१९–४–१९३१

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ... नं. ...
ता. ...
ठाणे.

# गुन्हेगारीण

[ चाल — प्रतिकूल होइल कैचा० — या पदासारखी — ]

कुणा तुझ्या वैभवाचा पडेल ना मोह ?
नाचतात मन्द वीची
कान्ति हिऱ्या-मोतीयांची
साक्ष कवि-हृदयाची
उडी का न घ्यावी ऐसा पाहतांच डोह ?

तुझी ऐकतांच तान
साथ द्याया तन-मन
उचम्बळे नादावून
ऐसे तुझ्या सङ्गीताचे आरोहावरोह !

शोभेशी न तुला जरी
लोटुं नको राया दुरी
परिसाची तुझी थोरी
होईन मी काञ्चनाची जरी असे लोह !

दिपले नि झाले अन्ध
लाथाडिले सारे बन्ध
घेतलासे तुझा छन्द
कशासाठीं आणिकाचा हवा ऊहापोह ?

तुजवरी प्रेम केलें
आणि गुन्हेगार झालें
परि तुझ्या कृपाबळें
शैलशिरीं सौभाग्याच्या नेईल हा द्रोह !

मे, १९३१

# स्फूर्तिदेवता

[ जाति – मुद्रिका ]

तू स्फूर्तिदेवता मूर्तिमन्त भाससी
ये नन्दनवन फुलवाया या उजाड मम मानसीं

दुक्खांतच अपरम्पार काळ कण्ठणें
क्षण जाति सुखद परि कांहीं तव आगमनें दर्शनें.

या तप्त सहारांत मी सदा पोळतों
तव आगमनें परि थोडी मी शीत झुळुक सेवितों.

मज नसे विषय तुजसवें वदाया जरी
बोलती कराया तूतें मी पुसतों कांहीं तरी.

कटु शब्दाघातें छिन्न होइ निशिदिनीं
लव विरङ्गुळा या जीवा लाभतो तुझ्या भाषणीं.

ती प्रसन्नता तव मुखीं आणि पाहुनी
वर्षाव पुन्हा अग्नीचा ये धीर सहाया मनीं.

सङ्गीत नष्ट जाहलें पार जीवितीं
तव अल्प सङ्गतीनेंही ये तया पुन्हा जागृती

तुजविषयीं हृदयीं भाव काय नान्दतो
तो केविं निवेदूं तूतें ? — माझाच मला नुमगतो.

परि एक मागणी गडे, अशिच येउनी
घन तमीं माझिया गेहीं तू चमक शुक्रचान्दणी

तव सुगन्धमय निश्वास आणि वितरुनी
या गुदमरलेल्या जीवा हो अशीच सञ्जीवनी

२६-६-१९३१

# मनोवासिनीस

[ गज्जल – उषा ]

तुझ्या मूर्तिनें माझ्या सदा व्यापिलें मना
दुजा नावडे धन्दा तुझ्या चिन्तनाविना

कुठें लाम्बुनी होई कधीं दृष्ट-भेट ती
मिळे चन्द्रिका तेणें तमोव्याप्त जीवना

कधीं कारणें कांहीं जरी येसि सन्निधीं
सुगन्धी प्रकाशाचें मिळे स्नान या जना

जगीं कैक सौन्दर्यें जरी पाहतों सदा
मुळीं मोहिनी त्यांची पडेनाच लोचना

तुझ्या साम्य रूपाचें दिसेना जरी कुठें
गमे काय येतोसा जगातें फिकेपणा.

तुझ्या मात्र रूपाची जरी साक्ष ये कुठें
वसन्तीं जशा वेली फुले तेंवि भावना

सदा अन्तराळीं मी तुझी मूर्ति पाहतों
जणों स्वर्धुनी माझ्या सजे दाह-वारणा

सदा अन्तराळीं मी तुझी मूर्ति पाहतों
तरङ्गे जणो कादम्बिनी स्नेहसिञ्चना

सदा अन्तराळीं मी तुझी मूर्ति पाहतों
सुधा भूवरी येतां करी देह-धारणा

कराया अपेक्षांची अशा गोड पूर्तता
त्वरें येइ वाराया जिण्याचा रितेपणा

कळे ना तुला हें का ? कळोनी मुकी कशी ?
अपेक्षा न शब्दांची परन्तू निवेदना !

२४-६-१९३२

# स्वप्न-सम्भ्रम

[ १ ]

[ सुनीतः शा. विक्रीडित ]

होते भाव अवाच्य जे मम मनीं, स्वप्नांत तू भेटतां
सारे साङ्गितले, जयांस नव्हतें धारिष्ट जागेपणीं.
नाहीं ते रुचले तथापि तुजला; केली विनन्ती तुवां—
' आहे जें अपुलें तसेंच पुढतीं नातें जगीं राहुं दे. '

भेटीचा अपुल्या निकाल कळला स्वप्नीं मला हा जरी
आलें त्या नव्हतें परन्तु अजुनी सत्यत्व जागेपणीं
लागे मानस घ्यावया उचल हें भेटावयातें तुला
ठेवी आंतुन आडवून न कळे माझीं कुणी पाउलें

कां तूंही असशील हेंच अगदीं स्वप्नामधें पाहिलें ?
शङ्केनेंच नसेल या न मजसी रोधूनिया ठेविलें ?
" कां स्वप्नें सगळींच सत्य ठरती ? " ऐसें पुसोनी मला
माझे भाव अवाच्य मान्य करुनी घेशील कीं, ना कळे !

होई कांहिं न सम्भ्रमीं उलगडा मातें; अतां तू तरी—
भेटायास जनास या विधुमुखी येणार नाहींस का ?

२९-७-१९३३.

## स्वप्न-सम्भ्रम

[२]

[ सुनीतः शा. विक्रीडित ]

स्वप्नीं काल तुला फिरून ललिते मी पाहिलें सन्निधीं
हातीं कांहिं सुरम्य घेउन मला दावावयाच्या मिषें
येवोनी बसलीस तैं बिलगुनी तू पाठमोरी जरा
हातांतील कृतीहुनी हृदयिंचे कीं भाव दावावया

पोटींशीं तुज मी हळूंच धरलें त्या पाठमोरेपणीं
तैं मागें मुरडून तूं बघितलें प्रेमान्ध आलोकनीं
‘ सर्वस्वी तुमचीच मी ’ पुसट हें येतांच ऐकावया
निःसङ्कोचपणें तुला अधिक मी ओढूनिया घेतलें.

दोघेही उठलों तिथून, सुटलों बेहोष तैं धावत
काठानें नदिच्या, सरोवरतटीं, केव्हां पहाडांतुनी.
मार्गीं सिन्दुर-लेपनीं दगड जों आला दिसोनी तया
साक्षी ठेवुन घेतल्याहि शपथा अन्योन्य-सम्मेलनीं.

स्वप्नीं पर्यवसान गोड अपुल्या हें मैत्रिचें पाहतां
होते दुस्सह जाग – दूर अजुनी ही जीमधें पूर्तता.

५-९-१९३३.

## चन्द्रग्रहण

[ शा. विक्रीडित–सुनीत ]

होता पेङ्गत चन्द्र अम्बरपथीं मद्भाग्यचन्द्रापरी
होता धावत आमुचा रथ परी येत्या अरिष्टापरी
पाठीला भिडवून पाठ वसलों आम्ही प्रवासी रथीं
झाला स्पर्श परस्परास डुलक्या घेतां कितीदा पथीं

येतां जाग दिसोन ये ग्रहण तों लोपून गेला विधू
येतां गाव रथांतुनी उतरलों, तों त्यांत माझी 'मदू'
माझी केवि म्हणूं अता ? दिसतसे कोणी तिच्या सन्निधीं
कौमार्येन्दु तिचा, क्षणीं उमगलें, ज्या लुप्त छायेमधीं

आघातासरशीं मनोरथगती माझी तदा खुण्टली
होतो चिन्तनिं रङ्गीत विलया स्वप्नावलीं पावली
भाग्याचे इमले मनीं उठवले,–अज्ञात वस्तुस्थिती
होता व्यक्त अशी समोर,–जळले, रक्षा उरे शेवटीं

'द्या हो दान, सुटे गिराण' करिती कल्लोळ भिक्षेकरी
मद्भाग्य-ग्रहणास मोक्ष कुठुनी लाभेल आतां परि.

१८-३-२६.

# येसि कशाला दारीं ?

[ चाल—दूति नसे ही माला ]

[ राग—सोरट—देशी ]

येसि कशाला दारीं ऐसा ऐन दुपारीं ?

भीक हवी जरि
झोळि रिती परि

दिसते का तरि सारी ? रीत दिसे तव न्यारी !

देतां भाकर
करिसि पुढें कर

पडते गळुन बिचारी ! कसल्या भ्रमसि विचारीं ?

जासी येथुन
जासि तडक पण—

का नगराबाहेरी ? शिरसि न का शेजारी ?

खेप न चुकते
वेळ न टळते

नयनीं नच लाचारी नवल गमे हें भारी !

एकच गुणगुण—
'तुजविण जीवन

होइ सुधाहि विषारी ' — गासी, हृदयविदारी.

बघसी इतुका
मज रोखुन का ?
का तू भृङ्ग, चितारी ? छे, दिसतोस शिकारी !
मिटलें पङ्कज
गेलें सावज
आतां फोल हुशारी, वेषान्तर, रहदारी !
हुकलें खलबत
नेई गलबत
पर-मुलुखा व्यापारी; भ्रमसी व्यर्थ किनारीं !
येउं नको रे
माजवि नच रे
खळबळ ह्त्कासारीं या सुरळित संसारीं
राखेचे थर
बसुनि जिच्यावर
ठिणगी जी पिचणारी फुङ्कर तिजसि न मारी
भीक घाल मज
दावि न मुख निज
घोर अनर्थ निवारी मी दुबळी अविचारी !

३-४-१९३३.

# वाळलेला वृक्ष

[ गज्जल–पाण्डव ]

[ राग–जीवनपुरी ]

वाळलेला हा तरू दारीं पहा माझ्या उभा
अन्तरीं होती स्पृहा ज्या चुम्बण्याची या नभा
पर्णराजीनें तनूतें भूषवीलें आपुल्या
अम्बराच्या प्रीतिचा होता परी न्यारा सुभा
साण्डल्या जैं मेघधारा, रङ्गवील्या कल्पना
सिञ्चितें स्नेहामृतातें कीं प्रिया या वल्लभा
काञ्चनाचे झोत फेकी भानु जैं भूमण्डलीं
मानिलें तैं केव्हढी ही प्रीतिची तीच्या प्रभा
चान्दण्याच्या सिन्धु-गङ्गा वाहतां फोफावुनी
येइ तेजोरूप तीच्या चिंत्तिच्या कीं सौरभा
ग्रीष्मतापें पोळतांही कल्पना केली मनीं
कीं पहाते ही कसोटी प्रेमदेवी दुर्लभा
कल्पनासाम्राज्य गेलें पार आतां तें लया
ही कहाणी काय पावे शुष्क या देहीं निभा
सोडितां आतां मुळाशीं आणुनी का कालवे ?
बोल खेदाचे वदोनी कष्टवीतां का जिभा ?

२९-३-३४

# क्षणिक चान्दणें

[ जाति–नवती ]

उगवत्या सुखा
उगवतां न, जाहलास मजसि पारखा !
म्हणुनि अन्तरीं
अन्धकार निबिड अतां पसरला जरी;–
काय बिघडलें ?
पूर्विंच्याच नैराश्यीं जीव तळमळे !

मात्र जोंवरी
होती तव प्राप्तीची आस अन्तरीं
तोंवरी किती
भाविकाल रङ्गवीत गुङ्गली मति
त्याच चिन्तनीं
भोंवतिची दाहकता विसरलों क्षणीं
हेंहि ना उणें
का न तमिस्रेंत सुखद क्षणिक चान्दणें ?

२५-३-१९३१

जीर्ण मठालगतच्या

# नदीचें मनोगत

[ ज्यांनीं आपली उभी हयात स्वदेश व स्वधर्म यांची उज्ज्वलता चिरस्थायी करण्यांत गुदरलेली असते त्यांच्या पुण्याईनें किंवा पराक्रमानें अस्तित्वांत आलेल्या सम्प्रदायाप्रमाणें स्मारकसंस्थाही नाममात्रच तग धरून असलेल्या आढळतात. भूतकालांतील ऐन आमदानींतला त्यांचा धडधाकट रसरशीतपणा आणि वर्तमानकालीन विगलित निस्तेजपणा यांतील तफावत पाहून प्रेक्षकांचीं मनें विव्हळ झाल्याशिवाय राहणार नाहींत. तशांतही त्या प्रेक्षकांपैकीं एकाद्या व्यक्तीचे हितसम्बन्ध व आप्तपाशच त्या मोडकळीस आलेल्या स्मारकसंस्थेंत गुंतले गेलेले असतील तर तिच्या हृदयाची तळमळ विशेषच असणार. प्रस्तुत कवन रचतांना, एका टेकडीवरील असाच एका साम्प्रदायाचा स्मारकतुल्य मठ डोळ्यांपुढें होता. त्या मठाच्या टेकडीच्या पायथ्यालगत वाहणाऱ्या नदींत एक मठवासिनी व्यक्ती उभी आहे असें कल्पून तिनें जाणलेलें नदीचें मनोगत कवनांत व्यक्त केलें आहे. ]

[ जाति—मुद्रिका ]

परतता घराला माय, मुलें त्रिलगतीं
पाखरें जशीं कणसातें वा भृङ्ग फुलाभोंवती
मी कैक दिसांनीं तशी ठाकतां इथें
जळ तुझें वाहिनी माझ्या का चरणीं घोटाळतें ?

लडिवाळपणें भुणभूण आर्जवें तशीं
वा फुशारकी गाऱ्हाणीं साङ्गती बालकें जशीं

तैशाच तुझ्या फेसाळ खळखळीमधें
चल साङ्ग साठल्या साऱ्या गुजगोष्टी, मज ऐकुं दे.

वान्धले बुरुज ते छिन्न अता जाहले
दरदिनीं त्यांतुनी येती गडगडुनि चिरे ढेकळें
जळ होइ गढुळ त्यामुळें ओघ अडखळे
का इतुक्यासाठीं होसी अन्तरीं व्यथित निर्मले

शुचिपणा तुला साधुनी दिला साधुंनीं
प्रतिदिनीं मेखला छाटी पात्रांत तुझ्या क्षाळुनी
हे तिथेंच बन्धू स्वार्थधुन्द झोम्बुनी
तुज विटाळिती रुधिरें, का ये कण्ठ म्हणुनि दाटुनी ?

ते प्रसन्न नन्दादीप जिथें तेवुनी
नैराश्यनिवारक झाले चैतन्यदायि या जनीं
प्रतिबिम्बें आणिक तूंहि मिरविलीं परि
काळोख नान्दतो येथें; का खिन्न म्हणुनि अन्तरीं ?

कम्पनें जियेच्या रणीं दळें थडकलीं
ती ध्वजा हुर्मुजी आजीं सान्दींत लपुनि राहिली
बान्धून मात्र काटक्या दिवे कागदी—
चढविण्यांत गढुनी गेले धीमन्त दिवाळीमधीं !

जीर्ण मठालगतच्या

# नदीचें मनोगत

[ ज्यांनीं आपली उभी हयात स्वदेश व स्वधर्म यांची उज्ज्वलता चिर-स्थायी करण्यांत गुदरलेली असते त्यांच्या पुण्याईनें किंवा पराक्रमानें अस्तित्वांत आलेल्या सम्प्रदायाप्रमाणें स्मारकसंस्थाही नाममात्रच तग धरून असलेल्या आढळतात. भूतकालांतील ऐन आमदानींतला त्यांचा धडधाकट रसरशीतपणा आणि वर्तमानकालीन विगलित निस्तेजपणा यांतील तफावत पाहून प्रेक्षकांचीं मनें विव्हळ झाल्याशिवाय राहणार नाहींत. तशांतही त्या प्रेक्षकांपैकीं एकाद्या व्यक्तीचे हितसम्बन्ध व आप्तपाशच त्या मोडकळीस आलेल्या स्मारकसंस्थेंत गुंतले गेलेले असतील तर तिच्या हृदयाची तळमळ विशेषच असणार. प्रस्तुत कवन रचतांना, एका टेकडीवरील असाच एका साम्प्रदायाचा स्मारकतुल्य मठ डोळ्यांपुढें होता. त्या मठाच्या टेकडीच्या पायथ्यालगत वाहणाऱ्या नदींत एक मठवासिनी व्यक्ती उभी आहे असें कल्पून तिनें जाणलेलें नदीचें मनोगत कवनांत व्यक्त केलें आहे. ]

[ जाति—मुद्रिका ]

परतता घराला माय, मुलें बिलगतीं  
पाखरें जशीं कणसातें वा भृङ्ग फुलाभोंवती  
मी कैक दिसांनीं तशी ठाकतां इथें  
जळ तुझें वाहिनी माझ्या का चरणीं घोटाळतें ?

लडिवाळपणें भुणभूण आर्जवें तशीं  
वा फुशारकी गाऱ्हाणीं साङ्गती बालकें जशीं

तैशाच तुझ्या फेसाळ खळखळीमधें
चल साङ्ग साठल्या सान्या गुजगोष्टी, मज ऐकुं दे.

बान्धले बुरूज ते छिन्न अता जाहले
दरदिनीं त्यांतुनी येती गडगडुनि चिरे ढेकळें
जळ होइ गढुळ त्यामुळें ओघ अडखळे
का इतुक्यासाठीं होसी अन्तरीं व्यथित निर्मले

शुचिपणा तुला साधुनी दिला साधुंनीं
प्रतिदिनीं मेखला छाटी पात्रांत तुझ्या क्षाळुनी
हे तिथेंच बन्धू स्वार्थधुन्द झोम्बुनी
तुज विटाळिती रुधिरें, का ये कण्ठ म्हणुनि दाटुनी ?

ते प्रसन्न नन्दादीप जिथें तेवुनी
नैराश्यनिवारक झाले चैतन्यदायि या जनीं
प्रतिबिम्बें आणिक तूंहि मिरविलीं परि
काळोख नान्दतो येथें; का खिन्न म्हणुनि अन्तरीं ?

कम्पनें जियेच्या रणीं दळें थडकलीं
ती ध्वजा हुर्मुजी आजीं सान्दींत लपुनि राहिली
बान्धून मात्र काटक्या दिवे कागदी—
चढविण्यांत गढुनी गेले धीमन्त दिवाळीमधीं !

केलेंस खुलें तू हृदय आज जिवलगे
अङ्गार ह्याच दुक्खांचा मम हृदीं नित्य धगधगे
परि मीहि असे अबलाच तुझ्यासारखी
मम दग्ध मनोराज्यांची ही राख पहा मस्तकीं

हरपतां अलौकिक अधिष्ठान मूळचें
कां स्मारक तें तळपावें ? भुइसपाट तें व्हायचें !
मी म्हणुनि आसवें सदा जरी रोधिलीं
समदुक्खी जीवा ! तूझ्या अश्रूंत आज मिसळलीं

२१-१०-१९३३.

# अपरिचितेची ओढ

[ जाति–चन्द्रकान्त ]

१

एकाकीपण बघुन कुणा हें येइल करुणा का
भूषवील का कुणी रिकामी ही जीवितनौका

स्त्रीहृद्याचा मिळेल कां या जीवा ओलावा
सुधानिधी स्वर्गीय तरीहि न ज्यासी तोलावा

पतङ्गापरी इतस्तता हें जीवित भिरभिरतें
सूत्रबद्ध कधिं होइल म्हणुनी हें मन हुरहुरतें

रागताल-विरहीत चाललें हें जें सङ्गीत
कधीं समेवर मिळून होइल सुरेल सुरळीत

करील माझ्या कोण गुणाचें कौतुक उल्हासें
यशें माझिया मुखीं कुणाच्या खुलेल कां हासें ?

मिळेल माझ्या पुरुषार्था प्रेरणा कुणाकडुनी
आणि तिची कधिं बान्धिन पूजा त्याच विक्रमांनीं

अनोळखी अनपेक्षित भिडली नजर कुणाचीशी
प्रश्नमालिका गुम्फुं लागलें आणि चित्त ऐशी

## २

कधीं कुणाचे नेत्रबाण या जिवा दुखवितील
दुखवितील ?—छे, उलट सारखे मात्र सुखवितील.

या बाणांच्या जरि पात्यांना प्रखर तीव्र पाणी
परी पारधी म्हणजे केवळ प्रेमाची राणी

जरी बोल्ती ' त्या बाणांची कृती जीवघेणी '
पारध्यास त्या कोण न देइल जीवाचीं देणीं

त्या बाणांनीं हरुन घेतले जरि पञ्चप्राण
तोच पारधी देउं शके परि फिरुन जीवदान

परम्परा प्रतिदिनीं मधुर ही सुखकर मरणांची
आपखुषीनें स्वीकाराया कोण न जगिं वाञ्छी ?

नजरबन्दिनें जाई बहरुन बाह्यान्तर जीव
इहलोकाला येउन भिडते स्वर्गाची शींव.

कधीं प्रीतिचे, कधिं रोषाचे, रुसवाफुगवीचे
नेत्रबाण कधिं विन्धितील का कुणा भिल्लिणीचे ?

ग्रंथ संग्रहालय
यशोगन्ध
स्थळ प्रत
सं. क्रमांक ११०३
ता. २८-१-१९३८

३

सुचे काम ना, रुचे धाम ना, मन धावे मात्र
सैरावैरा ह्याच विचारामागुन दिन रात्र

प्रशान्तता लोपली, लागली एकच हुरहूर
न्यून लागलें भासूं असुनी अवघें भरपूर.

बुजरें पाडस इकडे तिकडे उधळे चौफेर
मानस माझें धरूं लागले अचपळ तैं फेर

निघुनी बिन्दूपासुन वर्तुळ-रेषा परतून
बिन्दूमाजीं त्याच होतसे विलीन येऊन

तसाच झाला सुरू मनाचा एकच व्यापार
गुम्फुं लागले फिरुन त्याच त्या प्रश्नांचा हार

भ्रमणावस्था कधीं मनाची ही सम्पायाची
कशास जडली मनास असली बाधा भूताची

असार सारा गमे पसारा आणि मना व्यास
तोच लागला, पुरी तयाची कधिं होइल प्यास ?

४

अधीरतेनें वाट पहाया दारीं येऊन
कोण उभी राहील दूरवर दृष्टी लावून

मीहि वराला ओढ कुणाची लागुन परतेन
स्वागतोत्सुका बघुन जिला कीं जाइल मम शीण

भवसङ्ग्रामीं करुन चढाई तुम्बळ झुन्जाया
स्फूर्तिदायिनी पुनःपुन्हा मज कोण रणीं जाया

खड्गधराच्या मुठीस असते स्त्रीच अधिष्ठात्री
विदीर्ण शतधा हृदया फिरुनी स्त्री जीवनदात्री

नारायण सारथी लाभला, भाग्यवान पार्थ
होउनिया भ्रमनिरसन सहजीं प्रगटे पुरुषार्थ

परी तयाहुनि योद्धा दशरथ खरा भाग्यशाली
सारथ्यास्तव सज्ज जयाची अर्धाङ्गी झाली

अक्ष रथाचा भङ्ग पावतां धरिल सावरोनी
अपरिचिता मज अशी भरवणीं मिळेल कां कोणी ?

# सौन्दर्या विसरेन का ?

[ शार्दूलविक्रीडित ]

सौन्दर्या ! तव सङ्गतींत बनलों मी तैं पुरा बालक
होतों पाहत मूर्ति सन्मुख तुझी कीं डोलता लोलक
पैल्हपैलंतुनी तदा प्रगटलीं जीं वैभवें नाचरीं
त्यांचें वर्णन ना कुणी करुं शके मत्शब्दरत्नाकरीं !
होती ओझरतीच भेट अपुली लीले ! प्रवासांतलीं
त्या अल्पावधिचींच अक्षय परी चित्रें हृदीं रङ्गलीं
सप्तर्षी-मृग-व्याध-ब्रह्महृदया त्वां दावितां अम्बरीं
तें ताराङ्गण देखिलें परि तुझ्या मी मात्र नेत्रान्तरीं !
'ज्योत्स्नेमाजि कशी खुलावट वनश्रीची निराळी दिसे'
उद्गारांतिल सत्य या उमगलें भालीं तुझ्या राजसे !
होत्या ताम्बुस आणि नाजुक तुझ्या त्या पापण्यांच्या कडा
ओष्ठीं कोमलता नि रेखिवपणा, वाणी सुधेचा सडा,
नाकाच्या द्विदलास पातळपणा, तो डौल, तो रक्तिमा
वाटे बारिक शिम्पल्या उलटुनी सम्पादिली ती कमा
ती थण्डी कुटिला परि द्विगुणिता कान्ती तिनें जाहली
होता आणि पहाट तूं मजपुढें साक्षात् उषा ठाकली
दृष्टीगोचर पुष्पसौरभ कसा होईल केव्हां कुठें
उच्छ्वासांतिल वाफ पाहुनि तुझ्या हा प्रश्न माझा सुटे.
जातांना पुसलेंस प्राञ्जळपणें 'ठेवाल ना ओळख ?'
सौन्दर्या विसरेन का ?—बनविलें ज्यानें मला बालक.

२०-१२-१९३२.

---

# चन्द्रसेनेस

[ सुनीतः शा. वि. ]

शक्ती एकवटून सर्व, सजलों सङ्ग्राम झुन्जावया
आटोपे न परन्तु ही रिपु-चमू सैन्यास का माझिया
येते जी तुकडी तिला उधळुनी मी लावितों मागुती
तों तेथें दुसरी क्षणीं प्रगटुनी ठाके दमानें नव्या.

रक्ताचा जरि घातला रणिं सडा त्या रक्तबिन्दूंतुनी
सैन्यें उद्भवलीं जशीं नव-नवीं युद्धांत रामायणीं
तैशी भोंवति माझियाहि घटना कीं राक्षसी नान्दते
होती निष्फळ रामबाण म्हणुनी जे योजितों सर्व ते !

आतां राक्षससैन्यसम्भव रणीं हा थाम्बल्यावाचुनी
माझा केंवि निभाव भीषण भवीं लागेल युद्धाङ्गणीं ?
यासाठीं शरणागती तुजपुढें मी चन्द्रसेने उभा
व्हाया शत्रुनिरास केवळ तुझ्याठायीं रहस्यें, कला.

तू होशील जरी प्रसन्न तरि हा थाम्बेल कीं सङ्गर
तू शस्त्रास्त्र मदीय दिव्य, विजय-श्री मूर्त तू सुन्दर.

१५-१-१९३३.

## प्रतिमालेखन

तू तशीच राही उभी जराशी भिन्तीशी रेलुनी
घेउं दे प्रतिमा मज काढुनी.

तो किञ्चित निळसर शुभ्रपणा भिन्तिचा
करि हेवा जणुं कीं तुझ्या अङ्गकान्तिचा
हा मधुन लोम्बतो धवल पदर स्कन्धिचा
असा जुळुनि संयोग समसमा येइल कधिं कोठुनी
घेउं दे प्रतिमा मज काढुनी

तू उभी जराशी भिन्तीशी रेलुनी
भर एका पायीं, दुजा जरा उचलुनी
ती चन्द्रकोर बघ तशीच ताराङ्गणीं
किञ्चित कलती उभी राहिली जणु तुज अनुकारुनी
घेउं दे प्रतिमा मज काढुनी

नासिकीं तजेला, त्यांत मोरणी खुले
ते मृदुल लालसर कान किती कोवळे
त्या बिल्वदलाकृति डूल हलत शोभले
प्रभेंत त्यांच्या अधिक रङ्गती कपोल ते आरुणी
घेउं दे प्रतिमा मज काढुनी

चन्द्रिका सुगन्धी देहीं तव जाहली
रत्नांस मृदुलता देहीं तव लाभली

द्रवरूप सुधा ती द्युतिरूपा पावली
अशा अलौकिक आश्चर्यांच्या रमतां सम्मेलनीं
घेउं दे प्रतिमा मज काढुनी

तू नससी भीरू नससी वा उद्धता
ती विनयशीलता वाढवि तव चारुता
ते आयत लोचन करिती सुस्वागता
स्नेहीं तुझिया होइल जीवित उत्सव वा पर्वणी
घेउं दे प्रतिमा मज काढुनी

किति तरङ्ग उठती अनेक परिंचे मनीं
परि कसे अचानक दावुं तुला बोलुनी
परि अमान्य न करी एकच ही मागणी
तशीच राही उभी जराशी भिन्तीशी रेलुनी
घेउं दे प्रतिमा मज काढुनी

बघ शुक्र चान्दणी मङ्गळ तिजसङ्गती
परि अल्पावधिची असे तयांची युती
तैशीच भेटिची काय न अपुल्या गती
विरङ्गुळा परि मिळेल हृदया जीच्या आलोकनीं—
घेउं दे प्रतिमा मज काढुनी

१८–८–१९३३.

# तारिणी

सं. [सुनीतः-शां. वि.]

ठावा नाहिं तुझा प्रभाव तुजला, मी तो पुरा जाणतों
यासाठींच तुझें निरन्तर गडे सान्निध्य मी मागतों
राहे स्त्री पुरुषा जरी बिलगुनी वृक्षा जशी वल्लरी
आहे तारक तीच शक्ति मनुजा तत्रापि नानापरी

मीं तों केवळ चिल्खतासम, जरी संसार सङ्ग्रामसा
तू तों वीरमती मदीय चरितीं विश्वास वाटे असा
स्थानें भ्रामक आणि मोहक किती येती दिसोनी पथीं
कीं ज्यांचेवर टाकतांच चरणा तत्काळ व्हावी च्युती

होवोनी परि ऐन मोह-समयीं तूझी स्मृती देवते
झालों दूर कितीकदां, नि टळले ऐसे अधःपात ते
चित्तीं ज्यास स्पृहा हवी सहचरी धूतान्तरा त्वत्समा
त्यानें सन्तत पाहिजे चुकविलें देहें मनें कर्दमा.

आहे हा स्मृतिचा प्रभाव तुझिया, साक्षात् तुझी सङ्गती
आप्राणान्त जरी मिळेल तरि का लाभेल ना सद्गती ?

२३-७-३२.

---

# "—स"

[ गज्जल ]

किती आणि कुणापाशिं तुझे गाउं पवाडे
तुझा छन्द असा घेउन झालें मन वेडें

कुणी आप्त-जनांचे निज येती गुण साङ्गू
गुणीं तूच महावस्त्र, नि ते दीन सुताडे

तुझी देहलता उन्च, तुझे लाम्बट बाहू
स्वभावांतिल सारल्यहि चालींतुनि साण्डे

प्रभापूर्ण तुझें भाळ, तुझें लोचन चर्या.
तुझी भेट — तमोव्याप्त मनीं तेज उजाडे

वरें सान खुजीं कोन्दट तैसे जन भोंतीं
तुझ्या अन्तरिं औदार्य जणूं विस्तृत वाडे.

सुवासीक फुलांचाच सदा भाषण तूझें
जिथें सर्व जनें बोलति चोथा नि चिपाडें.

तुझ्या सङ्गतिनें माळहि जातील फुलोनी
खुलीं सर्व सुखाचीं क्षणि होतील कवाडे

नको राहुं तरी दूर, पिकें काढ गुणांचीं
नको सान्दिमधें टाकुं जिणें पात्र-चाडें

तुझा एक जया छन्द तया साथ करोनी
जनां दाव नसे केवळ संसार धुराडें

गमे काय तुला गैर विनन्तींत तरी या ?
पहा देतिल कोणीहि तुला हेच निवाडे !

१-७-१९३४

# संसार-सखी

[ गज्जल-अगोठ ]

तुझी मिळेल जरी जोड जीवितीं मजला
उठेल का न सुखाचा सदा नवा मजला ?

जिण्यास आणिल गोडी स्वतन्त्र मानधना
तशी न देइ खुमारी खरीच जी अ-बला

तुझें तुला मज माझें मिळून ध्येय गडे
जगांत राहुं, नकाशांत भू जशी द्विदला.

घरास येशिल जेव्हां दमून भागुन तू
सजेन मी पुसण्यातें त्वदीय घर्मजला

श्रवून उत्सुकतेनें पराक्रमा तुझिया
हळूच बक्षिस लाभेल गोडसें तुजला.

तसाच मीहि कधीं श्रान्त ठाकतां सदनीं
उमेदिला मम देशील तू स्मितें उजळा.

तुला पराक्रम माझे निवेदितां मग ते
कुटुम्ब कौतुक नेत्रीं तुझ्या दिसेल मला.

पिऊन तेंच दुणावेल अङ्गिंचा तकवा
शिडांत जाइल वारा नवीन सञ्चरला

मदन्तरांत कशानें नि काय तें खुपतें
तुझ्याच येतिल ध्यानीं मदीय गूढ कला

कितीक खाशिल खस्ता तदा परोपरिनीं
निवेल तें मम हृत्ताप वत्सले सगळा

तुझ्या मुखावर छाया न खिन्नता पसरो
झटेन मीहि अविश्रान्त, पुण्य तेंच मला

वड्या करूनि मनाच्या नि आवडी-निवडी
रुजेल खोल सलोखा परस्परामधला

हसूं, त्रसूं, रुसुनी दूर, मौन सेवुं, पुन्हा—
स्फुरून कांहिं अबोला विरेल तैं दुबळा.

हळूंच काढुनि खोडी सतावशील, तरी—
वसे समञ्जसतेची तुझ्यांत चन्द्रकला.

वरून अम्बर खाढून भू मिळे क्षितिजीं
गृहीं समेवर संसार सान्धतां अपुला—

मनोरथामधिं माझ्या नि मी तुझ्या रमुनी
निरोप देउं दिव्याला मिटून नेत्रदलां.

कधीं तरी मग येईल चान्दणी उदया
अभेद्य जीमधिं सामावतील आत्म-कला.

२५-७-१९३२

# आवाहन

१

[ शिखरिणी ]

तुझ्या मैत्रीमाजी मजसि सुख सारें मिळतसे
तुझ्या स्नेहामाजी तिमिर हृदयींचा सरतसे
तुझ्या रूपामाजी मजसि सण दीपावलि खरा
यशामाजी तूझ्या मम उगवतो दिव्य दसरा
तुझ्या दृष्टीमाजी उगम मम वे स्फूर्तिसरिता
तुझ्या भाळीं माझा खचित विलसे भाग्यसविता
तुझ्यासङ्गें सम्भाषण मज वसन्तोत्सव गमे
तुझ्या सौहार्दीं मी अनुभवितसे चन्द्रकिरणें.
चिकित्सेनें कांहीं जरि न पटलें यांतिल कुणां
कुठें त्यांना माझी नजर उमगाया तव गुणां
जरी नाहीं झालीं अभिमत तुला हीं स्तुतिपदें
परि श्रद्धा पाही प्रियतम जनीं सर्व विरुदें
असावें दीनाचें विभव कितिसें ?—तेंच परि गे
मनीषा कीं यावें तुजसि उपयोगास अवघें
तुझीं शल्यें दुक्खें मजसि उचलायास मिळुनी
झटावें त्वत्सौख्यास्तव, मजसि तें पुण्य भुवनीं.
कशाचाही आतां तरि धरुं नको आड-पडदा
त्वरें होई लोकत्रयिं मजसि सौभाग्य-वरदा.

---

# आवाहन

## २

[ शिखरिणी ]

कशासाठीं आतां अडुनि बससी साङ्ग सुभगे
करी चित्तीं हिय्या, चल जिवलगे, वेळ नलगे.
जरी शृङ्गाराला जवळि न मणी-काञ्चन-हिरा
जिवाभावाचा मी तुज चढवि बिन्दी-बिजवरा.

उभा दारीं हत्ती रथ न अथवा पालखि जरी
नसे या वाहूंची परि इतर कोणासहि सरी
कशाला वाजन्त्री ? मधुर सनई वाजत मनीं !
हवा पाठीराखा ? तरि तुजसि मी, तूं मज जनीं !

नभीं नक्षत्रांच्या बघ अतुल माळा झळकती
तशा सङ्कल्पांच्या कितिक हृदयीं ज्योति फुलती.
मुहूर्तासाठीं गे शुभ अमित शीघ्रत्व बरवें
मनःपूतालागी मिरवणुकिचें स्तोम न हवें.

पहा माझीं दारें पसरुनि उभीं हात अपुले
धराया पोटींशीं जनक-जननी काय सजले
तुझ्याठायीं रत्नाकरसम महौदार्य असतां
उणीवांची बाधा कुठुन निज होईल चरिता ?

तुझ्या पायीं गेहीं शिरुनि कमला ब्रह्मदुहिता
न मृत्यू-लोकाची कळुनि लव देतील कटुता.

६–७–१९३४.

# हे तीरावरल्या बाले !

[ जाति—उद्धव ]

हे तीरावरल्या बाले !
लागली नाव धारेला.

आवलीं मारुनी थकले हे दण्ड, ऊरही भरला.
जरि दोर फेकशिल अजुनी येईल सावरायाला
ना तरी चालली वेगें सर्वस्व-विनाश-पथाला
भोवरे भयङ्कर फिरती
वेरुनी खेचुनी नेती
विक्राळ नक्र सरसरती
देखून दृश्य, ना त्यजिसी का अजुनि शान्तिशीलाला ?

जाऊन सूर्य अस्ताला लागला चढूं अन्धार
भणभण हा वाहे वारा मेघांनीं धरिली धार
जळ हेलकावतां करितें ध्वनि सळसळ, भिववी फार
ठागा न तळाला लागे
अम्बेकरि कोणि न संगें
जळ अफाट आगेंमागें
जोंवरि न भडकली दूर तों सोडि शान्तिशीलाला !

मारितों न मी ह्या हाका माझ्याच मुक्ततेसाठीं
ठेविले जपुनि हृदयाशीं जे हिरे आजवर मोती
नी दौलत काय बुडूं दे कर्दमीं, सागरापोटीं ?
किति दीन बन्धु मम पाही
पणती न ज्यांच्या गेहीं
वाञ्छितों उजळुं त्यां कांहीं
सहकार या तरी कार्यी दे, त्यजुनि शान्तिशीलाला !

हा योग अढळ वृत्तीचा मोक्षार्थ कोणत्या वरिसी ? —
जो विमुख व्हावया शिकवी सङ्कटांत भूतदयेसी ?
"तारिणी अनन्या" ऐशी भावना भग्न का करिसी ?
ही भूल भयङ्कर कसली
ह्या निर्वाणीच्या वेळीं ?
ही अखेरची आरोळी
हे तीरावरल्या वाले ! लागली नाव धारेला

जरि अजुनि टाकशिल दोर
येईल सावरायाला

पुणें,
२०-१०-३४.

# गोरज मुहूर्तावर

[ वृत्तः---शा. विक्रीडित ]

विष्णूच्या चरणांतुनी उतरली नान्दावया भूतलीं
पावित्र्यें पहिली म्हणून सगळ्या तीर्थांमधें गाजली
वास्तव्यें जिचिया अनन्यपण या नान्दे जणों भारतीं
संसारीं तुमच्या अखण्ड वितरो माङ्गल्य भागीरथी.
'लक्ष्मी चञ्चल' दूषणें जन अशीं देतात;—देवो कुणी !
विष्णूच्या रमली असे निशिदिनीं ती पाद-संवाहनीं
मायेनें जिचिया मनोरमपणा भूमण्डला लाधला
संसारीं अपुल्या निरन्तर रमो ती पङ्कजा मङ्गला
संसारास सुबुद्ध कोणि म्हणती 'हा सिन्धुसा भीषण'
त्याच्या भीषणतेस सुन्दरपणा आणावया ये पण
लोकीं आचरणाप्रती सुमतिच्या स्वाधीन ठेवूं जरी
येई सङ्कटवीचि निर्भयपणें लङ्घावयातें तरी
कोणी सान अजाण दीन अपुले स्नेही सगे-सोयरे
प्रेमें स्वागतशील वर्तन जरी त्यांच्यासवें होय रे
गोपाळासम आपुल्याच भजनीं लावाल त्यांना जरी
शत्रूंच्या मग लागतील न झळा केव्हांहि लोकीं तरी
ध्येयाचे स्वर आळवीत कितिही आवर्तनें घेतलीं
संसारीं लय आणखी सम सदा ती पाहिजे साधिली
गायी जाउनिया वना परतल्या, त्यांच्या खुरांच्या धुळी
हा सन्देश निरोपिती विखरुनी कीं काय दिङ्मण्डळीं.

पुणें
४-३-१९३४.

---

## घर-भरणी

[ गज्जल-आनन्दकन्द ]

या स्वामिनी घराची
येणार तू म्हणोनी
दारीं सुवासिनी घ्या
नीराञ्जनें धरोनी.
हीं वाजतात वाद्यें
येणार तूं म्हणोनी
माङ्गल्य-गीत साङ्गे
तू मङ्गला गुणांनीं
हें धान्य-माप दारीं
येणार तू म्हणोनी
लोटून, साङ्ग आली
लक्ष्मी तुझ्या पदांनीं
ही गाय हम्बरे ही
येणार तू म्हणोनी
ये मूर्त कामधेनू
रूपीं तुझ्या गणोनी
माझ्यासवें इथोनी
येणार तू म्हणोनी
मी मात्र गौरवीतों
माझ्याच आसवांनीं

२४-३-१९३३.

# गोलघुमटांत

[ सुनीतः—शा. वि. ]

जैसा एकच टाकिला जरि खडा त्या सन्थ पाण्यावरी
एकामागुनि एक कैक वलयें उत्पन्न होती तरी
तैसा एकच शब्द गोलघुमटामाजी जरी बोलसी
त्याचे उद्भवती निनाद किति, हें आश्चर्य तूं मानिसी

का आश्चर्य तुला चमत्कृतिमया कारागिरीचेंच ह्या ?
देहाच्या दुनियेमधेंहि तसली कारागिरी माझिया.
बाले ! तो प्रिय शब्द एकच तुवां उच्चारिला जेधवां
मच्चित्तीं घुमुनी अनन्त पटिंनीं सामावला तेधवां

जाती येथिल हे निनाद विलया अल्पावकाशें तरी
बोलाचे श्रवतो निनाद तुझिया हा काल मी अन्तरीं
येई ऐकुं इथें जरी पुसटही टोकास त्या बोलतां
मौनाचेहि तुझ्या निनाद घुमती ही मन्मनीं सूक्ष्मता.

आलें काय न हें तुझ्या अनुभवा आश्चर्य ? कारागिरी ?
त्याची आकृति काढिली घुमट हा बान्धून कोणी तरी !

२३-७-१९३२.

---

# सङ्क्रान्तिचा तो दिवस !

[ वसन्ततिलका ]

अद्यापि ते दिवस येति मदीय ध्यानीं
मज्जीवनांत भरली नवता जयांनीं.

सङ्क्रान्तिचा दिवस आठवतो तुला का ?—
त्वां जेधवा फुलविली मम भाग्य-राका.

घेऊन शुभ्र हलवा निज रौप्य-पात्रीं
आले अकल्पित तुझ्या सदनास रात्रीं
होते उभी तुजपुढें हलवा करोनी
त्वां पाहिलें मजसि लोचन तैं भरोनी

" का शुभ्रताच अवघी ? नच ह्यांत रङ्ग ? "
प्रश्नास उत्तर दिलें तव काय ? साङ्ग !
" ह्याच्यांत रङ्ग भरणें "—वदले हळूंच
" हें काम केवळ अतां तुमच्याकडेच ! "

टाकांत घेउनि तदा झणिं लाल शाई
" कोठें भरूं ? " म्हणुनि चालविलीस घाई.
मी तों मिटून नयनें तुझिया पुढारा
होतेच निश्चल तशीच उभी मयूरा !

तों स्पर्श शल्यसम, गार, मदीय भाळीं—
होतां, क्षणीं पुलकिता तनु ही जहाली.
शीर्षीं तुझ्या उधळिला हलवा समस्त.
बोलून 'बालिश!' तुवां धरिलास हस्त.

ताराङ्गणासम तुझी गमलीच खोली
तीमाजि तू विलसलास हिमांशु-माली
होती सुगन्ध वितरीतहि रात-राणी
भाळावरील नव्हती सुकली निशाणी.

मज्जीवनामधिल ती रमणीय राका
सङ्क्रान्तिचा दिवस आठवतो तुला का?

१४-३-१९३४.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वच्छ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
अ. क्र.
[सुनीत:—दिण्डी]

# एकरूपता

दिलीं दारीं लावून दोन रोपें
करुनि जीवन ठेविलें तया सोपें
वाढ झाली जोमांत सुरू त्यांची
जणों स्पर्धा चालली उभयतांची

झुळुक पवनाची डोलवी सहर्ष
सुखवि त्यांना जरि मधुन घडे स्पर्श
आणि भंवती जों सामसूम होई
मधुन त्यांची कुजबूज ऐकुं येई

ऋतू एकामागून एक आले
पाठ देउन फुलवून भाव गेले
क्रमें शाखा विस्तार पावलेल्या
एकमेकामधिं पार मिळुनि गेल्या ;

बघुनि चारित्र्यें एकरूप त्यांचीं
तीव्र शल्यें विसरतों अन्तरींचीं

१९-३-१९३३.

# हिरे ?–छे, निखारे !

[ दिण्डी ]

हाव सुटली मज हिरे-माणकांची
लूट म्हणुनी मी चालविली त्यांची
जिथें कोठें मज हिरा दिसुनि आला
तिथें माझा पडलाच शीघ्र घाला

नृपाळांचीं फोडिलीं किती तख्तें
हात धनिकांच्या माखलाहि रक्तें
बली निष्ठुर गाजलों चक्रवर्ती
सर्व रत्नाढ्या जिङ्किली धरित्री.

रङ्क जमले करण्यास तपश्चर्या
प्रभुस माझा प्रार्थिती सूड घ्याया
देव झाला जैं तयांना प्रसन्न
क्षणीं धुन्दी मम होइ छिन्नभिन्न

कृपासिन्धूचे धरुनि पाय मीही
आर्जवीलें "मम सोय करा कांहीं
करा शासन कसलेंहि मज भयाण;
हिरे माझे परि घ्या न हिरावून.

‘अन्य जन्मींही वेड हिऱ्यांचेंच
प्रभो पुरवा; मागणें एवढेंच!’
करुनि माझें त्यांचेंहि समाधान
स्वधामातें प्रभु जाइ तैं निघून.

होइ माझा अवतार तो समाप्त
जन्म होई हा फिरुन मला प्राप्त.
अतां खातों भाकरी आसवांशीं
कोळशांच्या लाभल्या मज मिराशी.

वेड अजुनी डोक्यांत नाचतें तें
हिरे निर्मी हा, म्हणति लोक मातें
हिरे परि हे मज जाळिती अरेरे!
हिरे कसले?–रसरशित हे निखारे!

९-३-१९३३.

# जा सुखें पाखरा

[ जाति–प्रणयप्रभा ]

[ राग–मिश्रपिलु ]

जातोस सोडुनी काय घरा ?
जा सुखें पाखरा दिगन्तरा !

गृह नच हें, ही जळे शेगडी.
त्यांत अभाग्या तुझी पडे उडि
जळुनि कोमला तव जाइ कुडी
सुटलास मात्र तू आज खरा
जा सुखें पाखरा दिगन्तरा !

तुवां अरेरे चोंच वासली
परि मजभंवती आग भडकली
नयनीं सरिता म्हणुनि करपली
तरि कुठें थेम्ब रे कबूतरा ?
जा सुखें पाखरा दिगन्तरा !

विहङ्ग तू गन्धर्वलोकिंचा
शापें भ्रष्टचि गमसी साचा
उःशापास्तव वास येथचा
योजिला तुझ्यास्तव काय जरा ?
जा सुखें पाखरा दिगन्तरा !

त्याच परी उःशापाखातर
थाम्बुनिया या तरुशाखेवर
किलबिल ऐकविली त्वां सुस्वर
उमळला या रणीं मधुर झरा
जा सुखें पाखरा दिगन्तरा !

झाड निरन्तर जें वठलेलें
लागुनि त्या तव चरण चिमुकले
पल्लव किञ्चित काल प्रगटले
क्षण तुरा बहरला शुभङ्करा !
जा सुखें पाखरा दिगन्तरा !

पुन्हा सुरू हें अपर्ण जीवन
फिरुन भोंवती ज्वाळा-नर्तन
तयांस निर्ढावलें असें मन
सुटलास मात्र तू आज खरा ?
जा सुखें पाखरा दिगन्तरा !

फेब्रुवारी, १९३३.

# शैवालानें आच्छादलेल्या
# विहिरीचें गाणें

[ १ ]

[ राग-भूप ]

[ नदी नसलेल्या गांवीं पाणोठ्याचा सर्व कार्यभाग एखाद्या प्रशस्त विहिरीकडे येतो. अशा प्रकारची, निळीनें-पृष्ठभागावर तरङ्गणाऱ्या रेणुमय शैवालानें-आच्छादलेली विहीर सूर्योदयीं म्हणत आहे.— ]

हळु हळु हळु दिनमणि हा उदयाचलिं आला
फुलवाया जणुं माझ्या भाग्यपङ्कजाला

येइल तो शेतकरी
लाविल मग मोट वरी
नेइल मम जीवनांश पिकविण्या पिकाला

येतिलही किति गृहिणी
नेतिल जल घट भरुनी
निज चरणीं वाहुनिया देहिं वलयमाला

घेइल कुणि वरुनि उडी
देइल कुणि पोटिं दडी
लाडानें झटति मुलें जेविं माउलीला

कलशातें वसनातें
क्षाळतील जन येथें
भाग्य थोर !—करुं शकते विमल मलिनतेला

सकलांच्या व्यापारीं
ही सरेल नीळ दुरी
प्रतिबिम्बें आणतील भरति वैभवाला
हळु हळु हळु दिनमणि हा उदयाचलिं आला.

२७-२-१९३३.

---

## शैवालानें आच्छादलेल्या
# विहिरीचें गाणें

[ २ ]

[ लोकांचे व्यवहार थाम्बत आल्यावर तीच विहीर अस्तमानीं म्हणत आहे— ]

शैवालानें मला टाकिलें व्यापुन पुरतेपणीं
गुदमरे जीवहि त्या दडपणीं

बाहेर वाहते वाऱ्याची झुळझुळ
लागतां तयाची पुसट कधीं चाहुल
चलबिचल अन्तरीं करि मजला व्याकुल
परी सुटेना मिठी तयाची बसली जी जखडुनी
गुदमरे जीवहि त्या दडपणीं !

कुणि घरा सखे जन येतां प्रेमादरें
फुटतात अन्तरीं उकळ्या, स्मित मोहरे
हें तितुक्यापुरतें पटल बाजुला सरे
वळतां त्यांची पाठ पुन्हां हें येई सरसावुनी
गुदमरे जीवहि त्या दडपणीं !

जें जया हवें तें जातो तो साधुनी
सेवेस सज्ज मी सकलांच्या खिदळुनी
खिदळतेंहि आपण हें मज अनुकारुनी
परी तयाची घोर उपाधी जाची मज निशिदिनीं
गुदमरे जीवहि त्या दडपणीं

मी स्वताच असुनी विमल जलाचा झरा
आमरण राहणें तृषाक्रान्त घाबरा
ही नीति निष्ठुरा तुझी दयासागरा
का न निखन्दूं तुला जोंवरी नरक असा जीवनीं
गुदमरे जीवहि त्या दडपणीं

५-७-१९३२.

# निष्ठुर ईश्वरास

[ वृत्त-स्रग्विणी ]
[ राग-जोगी ]

का पटेना तुझी ईश्वरा थोरवी
धीर तेजोहता देतसे जी भवीं

ठाकलों केव्हढा बान्धुनी चङ्ग मी
भागलों डोङ्गरीं कण्टकीं कर्दमीं
साद ना साउली जी जिवा रङ्गवी !
का पटेना तुझी ईश्वरा थोरवी ?

साधु-सन्तादिकीं गायिले गोडवे—
"आपदांचें जरी सैन्य ये आडवें
त्यास देशोधडी त्वत्स्मृती घालवी"
का पटेना प्रभो ती तुझी थोरवी ?

रात्र लोपे, रवी ये उमाळ्यावरी
होति निष्पर्ण जे वृक्ष ज्या वल्लरी
लाभते त्यां नवी सम्पदा पालवी
का पटेना प्रभो ती तुझी थोरवी ?

पाखडे मासळी प्राण पाण्याविना
वाहती बाजुंनीं वारणा कोयना
धूळिचे तोबरे दैव दे दानवी
का पटेना तुझी ईश्वरा थोरवी ?

भूप दे शासना–' मांस देहांतुनी
टांक-दो-टांक घ्या रोजचें काढुनी '
वृत्ति तूतें रुचे तीच का पाशवी ?
का पटेना तुझी ईश्वरा थोरवी ?

यज्ञ-कुण्डापरी पेटल्या जीवितीं
हाय सर्वस्वही टाकिल्या आहुती !
आणखी कोठला आणुं आता हवी ?
का पटेना तुझी ईश्वरा थोरवी ?

१७-३-१९३४.

# विसंवाद

[ चालः–' परवशतापाश दैवें० ]

जगताच्या सूत्रधारा लीला तुझी निष्ठुरा
विसंवाद निर्मुनि सारा हाससी कठोरा ॥

दाविसी तृषार्ताला तू नेमका सहारा
पङ्ख कापुनी विहगातें म्हणसि ' जा विहारा '

रुची ज्यास गवताची त्या देसि मोति-चारा
कुजे कर्दमीं त्याभंवती तारका-पसारा

स्पृहा ज्यास स्वातन्त्र्याची त्यास घोर कारा
कधीं साथ मिळण्याजोग्या जुळविणार तारा ?

# विरोधी घटना

[ अभङ्ग ]

मिळावा मोत्याचा चारा ज्याची आस
वांळूची ये रास त्याच्या ताटीं.

मेघोदकासाठीं तृषार्त जो प्राणी
डबक्याचें पाणी देसी त्यास

वाञ्छितो डुम्बाया शान्त चन्द्रिकेंत
तप्त फोफाव्यांत लोटिसी त्या.

हवें तें मिळेना, नको तें बिलगे
आणि जीव भागे रात्रन्दीस

तगमग थाम्बे आणि जों शेवटीं
आहेर वराती धाडितोस.

निमालियावर इच्छा आणि रुची
तुझिया कृपेची काय चाड ?

५-५-१९३१

## अन्तरींचा वैरी

[ ‘ वैरी न चिन्ती तें मन चिन्ती ’ म्हणजे मन वैऱ्याहूनही वैरी आहे. किंचित् अनुकूल परिस्थितीचा पुसट आभास जरी उत्पन्न झाला तरी तें भव्य सुखस्वप्नें रङ्गवूं लागतें. परन्तु वस्तुस्थितींत त्या सुखस्वप्नांचा अल्पांशही उतरणें अशक्य आहे असें बहुशा आढळतें. अशा स्थितींत तीं सुखस्वप्नें उभवून मन आपलें वैरच साधत नाहीं का ? ]

[ वृत्त—गीतिका ]

इमले मना उभवूं नको लवमात्र या झुळुकेवरी
उलटी दिशा मिळतां तिला सगळेच येतिल भूवरी
सुखसाउलीसहि जीव जो भुलुनी पळे तिजमागुती
इमलेच कोसळतां तयांसह तोहि येईल खालती

कधिं खाउनी नुसते चणे कधिं भाकरी जळकी शिळी
अथवा जलावरती कधीं गुजराण जो करि आपुली
परि त्यास नेउनि दाविसी नुसतींच षड्रस भोजनें
ढकलून देसि जगावया फिरुनी धुळीमधलें जिणें.

बुरख्यांत वावरती कुणी अथवा कुणी अगदीं खुले
जरि भेटले कधिं यापरी रिपु ते कसे तरि साहिले
परि नित्य मोहक रीतिंनीं मम वैर यापरि साधिसी
प्रतिकार ना करुनी, मना सहजींच जीव पडे फशी

विपदेंतल्या गुरुवेदनाहुनि वञ्चना कटु दुस्सहा
कळुनी भुले तुजसी पुन्हा परि दारुड्यासम जीव हा
म्हणुनीच निर्दय वञ्चका ! तुझियापुढें शरणागति
उभवूं नकोस हवेमधीं मणि-हेम-युक्त इमारती

१७-४-३१

# वञ्चनेच्या वाळवण्टीं

[ गज्जल–पाण्डव ]

रङ्गवीतों रम्य चित्रें, त्यांपरी सृष्टी कुठें ?
देउं जातों ज्यां मिठी ते आप्त अङ्गीं चोरटे !

पाहुनी ओढा खळाळे धावतों तृष्णार्त मी
ओंठ नेतों जों जलाशीं तों दिसे तें ओखटें

पाहुनी ज्यांना कराव्या थोर आकाङ्क्षा मनीं
चौकटी गेहा खुज्या त्यांच्या, सदा माथा फुटे

आणि जेथें भव्य दारें उन्च मोठीं मन्दिरें
तेथ दीनांची न वर्दी, मान्य होती भामटे.

पूज्य जी होऊन राहे लौकिकीं ती पाहतां
आसनाच्या वन्द्यतेनें फक्त ती मूर्ती नटे

चन्द्रिका या वस्तुमात्रा रूप देई गोजिरें
टोचती मार्गीं परी पायीं खडे काटेकुटे.

वञ्चनेच्या वाळवण्टीं प्राण पोळे प्रत्यहीं
आस मेल्यावाचुनी होईल कैसें गोमटें ?

८–४–३३

---

## अन्धार !

[ मोहिनी ]

घरीं आणि दारीं भरला घोर तिमिर सारा
एकही दिसेना कोठें व्योमपटीं तारा !

'पाय पुढें टाकित जा कीं सापडेल वाट
लङ्घुनिया दुस्तर जाशिल किर्र रान घाट'
कैक यत्नवाद्यांचे हे आचरिले पाठ
प्रचीतीस ठेचा खोका आणि रक्तधारा
एकही दिसेना कोठें व्योमपटीं तारा !

प्रथम जरा आले कानीं सूर दिलाशाचे
अणूमात्र आतां नुरले मागमूस त्यांचे
भेडसावणी भूतांची सभोंवती नाचे
उबारा न मिळतां थिजतो उमेदिचा पारा
एकही दिसेना कोठें व्योमपटीं तारा

रक्त आटवावें ज्यांस्तव त्यांस ना फिकीर
न्यून वर्म परि आढळतां सोडितात तीर
त्वचा सोलण्याला सजती मिळावया गीर
सदा स्वार्थ-सङ्गीतास्तव पिळति जीव-तारा
घरीं आणि दारीं भरला घोर तिमिर सारा !

‘ नको फलाकाङ्क्षा ठेवूं ’ साधु साङ्गतात
‘ जिणें आन्धळी कोशिम्बिर ’ हाच काय अर्थ ?
कसा फलाशेविण पिकविल शेतकरी शेत ?
बोल तुझे सन्ता ! भ्रामक फोल रे पिसारा
एकही दिसेना कोठें व्योमपटीं तारा !

वर्तमान-तटबन्दी ही भोंवती अभङ्ग
पङ्ख कापुनी पडलेला त्यांत हा पतङ्ग
बगीचा न भंवती, कुठला गन्ध वा मरन्द ?
कधीं नशीबींची का ही सम्पणार कारा ?
घरीं आणि दारीं भरला घोर तिमिर सारा !

२४–२–१९३४

# दैवी सूड

[ सुनीत–शा. वि. ]

सौन्दर्ये भंवती कितीक दिसती सृष्टीमधें साठलीं
त्यांचीं काय सुखें तया जळत जो दुर्भाग्यदावानलीं
ज्याच्या शक्य नसे कधीं निखळणें पायांतल्या शृङ्खला
हे गाते फिरते विहङ्ग बघुनी सन्ताप हो त्याजला.
तारे यन्नयनापुढें चमकती दैवप्रकोपामुळें
त्याला सौख्यद अम्बरामधिल का तीं तारकामण्डलें ?

देहातेंहि भिजावयास पुरतें पाणी न ज्या पल्वलीं
तेंही आटत चाललें हळुहळू ग्रीष्मामुळें, त्यांतली—
कोणी दुर्भग मासळी तडफडे, तीच्या सभोंती परि
कासारें भरलीं तुडुम्ब, लहरी उत्फुल्ल त्यांच्यावरी,
मासे आणिक हंस त्यांत फुलल्या पद्मासवें क्रीडती
दृश्यें सुन्दर ठेविलीं उभवुनी का हीं अशीं भोंवतीं

देवा ! दारुण दु:स्थितींत पिचुनी भोगीतसे जो व्यथा
त्याचा सूडच आणखी सजसि कीं घ्याया असा सर्वथा !

१–३–१९३१.

# भङ्गतो आडसर आज

[ जाति–प्रणयप्रभा ]

भङ्गतो आडसर आज परि !
टिकणार कोठवर तोहि तरी ?

किती क उठल्या पूर्वी लाटा
थडकुन गेल्या आल्या वाटां
ढळला नच परि ज्याचा कांटा
तो तुफानांत या तृणापरी
भङ्गतो आडसर आज परि !

प्रमत्त कुञ्जर देतो टकरा
चिडून अधिकाधिक ये निकरा
उखडुन टाकिल पर्वतशिखरा
तया थोपवुन कोण धरी ?
भङ्गतो आडसर सहज तरी !

तोण्ड खिण्डिचें दाबुन धरिलें
शरीर अवघें चाळण झालें
नव्या दमाचे येतां हल्ले
तो पडे धैर्यधर धरणिवरी.
टिकणार कोठवर तोहि तरी ?

रक्त फुटे तों लगाम खेचुन
धरला उच्चैश्रवा आवरुन
लगाम तुटतां परन्तु काचुन
तो भिरकावुन दे स्वार दुरी
टिकणार कोठवर तोहि तरी ?

धरण जातसे आज दुभङ्गुन
जातिल खेडींपाडीं वाहुन
अनर्थ दिसतो निकटीं दारुण
या प्रळय-काळच्या महापुरीं
भङ्गतो आडसर आज परि !

शक्त न आता मनोनिग्रहा
पाप, पुण्य वा,—नुरे भेद हा
कसेंहि या सोडवा विग्रहा
करुं फिकीर किति मी कोठवरी ?
भङ्गतो आडसर या निकरीं !

१०-८-१९३२

# भरधाव फेक तव वारु मना !

[ जाति–प्रणयप्रभा ]

भरधाव फेक तव वारु मना !
निमिषांत आक्रमूं चल गगना.
  वाञ्छा दुर्लभ मोहक चिन्तुनि
  कष्टी का व्हा शान्ति गमावुनि
  म्हणुनि ठेविलें तुला दडपुनी
त्या आज झुगारी संयमना.
  अन्धाऱ्या तळघरांत कुजणें
  गुरासारखें सदा राबणें
  अखेरपावेतों हें जगणें
तरि करूं काल्पनिक सम्भ्रमणा.
  फुलती पुष्पें, झळकति तारे
  शीतळ किरणें, सुगन्ध वारे
  कारागारीं कोठुनि बा रे ?
आभास निर्मुनी दाव पुन्हा
  प्रत्यक्षीं यातना भोगणें
  परि दिसतां तव स्वप्नोद्यानें
  धार तयांची झणिं बोथटणें
ही पटवि जादु हतभागि जना.

३०-५-१९३१.

## चढवितों मुखवटा आज नवा

[ जाति–प्रणयप्रभा ]

[ राग–मालकंस ]

चढवतों मुखवटा आज नवा
होईल जनां जो हवा हवा

विश्व असे जर भव्य रङ्गपट
प्राणिमात्र त्यावरी नटी-नट
स्वभूमिकांस्तव करिती खटपट
पथ मीहि तो न कां सेवावा ?

नातीं-गोतीं रङ्ग फासुनी
उपचारांचे बोल घोकुनी
गृहीं आग्रहें जन बोलवुनी
कीं मेळविती वाहवा दुवा !

अशा नाटकी जगाकडोनी
काय लाभ मज ?—जरि मनधरणी
केली आर्जवुनी कळवळुनी;
शमवील व्यथा कोणता दवा ?

जीव तोडुनी क्रन्दन केलें
सकल त्यामुळें कष्टी झालें
कुणा परन्तु न पाझर फुटले
करुं काय आणखी खिन्न हत्रा ?

हास्यरसामधिं अतां डुम्बतों
सभोंवारही हास्य उधळतों
विरघळती का शल्यें बघतों
बघुं येइ चाल्ता काय भवा ?

इन्द्रधनू परि गगनीं पाहुन
'तें न विलसतें पर्जन्याविण'
न्याय हाय हा ध्यानीं घेउन
निःश्वास आपुले न ऐकवा !
चढवितों मुखवटा आज नवा.

७-१-१९३४.

# जग–रहाटी

[ चाल–"प्रतिकूल होइल कैंचा०—" ]
या सारखी

जगा ! तुझी सारी तऱ्हा सदा उफराटी !

एक तरी बागेंतील
फूल कौतुकें देशील
बाळगिली आशा फोल
अतां पुष्पराशीमाजी बुडे मात्र ताटी !

आपुल्याच जातां पायीं
पाडियलें ठायीं ठायीं;
केव्हढी ही आतां घाई
चालविती द्याया खान्दा; मिरविती हाटीं.

फुकटचा शब्द गोड
बोलला न कोणी धड
उठविली निन्दा-झोड
स्मशान हें निनादतें अतां स्तुति-पाठीं.

साद कुठें येईल का
ह्याच अपेक्षेनें एका
तुडविले तिन्ही लोकां
मिठ्या कलेवरा द्याया अतां आतदाटी.

हयातींत आगडोम्ब
विझविण्या एक थेम्ब
मिळाला न; आतां कुम्भ—
किती रिकामे हे होती तिळाञ्जलीसाठीं

उभविला स्नेह-गाथा
पाचोळाच आला हातां
खिळे-ठोक झाली माथां
अस्थिवरी देवालयें अतां नदीकाठीं.

मिळावया ऊब कोठें
झिजवितां उम्बरठे
वन्द दार जेथें तेथें;
धूपारती शेजारती अतां दिनरातीं.

सतावून यावज्जीव
ओलाण्डतां आतां शीव
दाखविती प्रेम-भाव
परिमार्जनाची धन्य तुझी ही रहाटी !

२४–६–१९३३

## यशःपथावर

[ दिण्डी ]

नको माझ्या मार्गीत पौर्णिमेची
मला उन्मादक चन्द्रिका यशाची
सदा अपुरेपण असो सिद्धिमाजी
तेंच ठेविल उत्साह-शक्ति ताजी

होइ भरती जरि एकदा समाप्त
तरी ओहोटी पुढें क्रमप्राप्त
आज दिसतो जो पौर्णिमांशुमाली
अमावास्या तो सुचवि निकट आली

मधुनि-मधुनी फटकाहि अपयशाचा
मला उपकारक रणीं व्हावयाचा
जमीनीला लागेल जरी पाठ
बळें द्विगुणित होईन पुन्हा ताठ

जरी सन्तत सहजीच यशःप्राप्ती
मन्द तेणें होईल नेत्रदीप्ती
माप कष्टाचें पुरेपूर द्यावें
आणि लोकीं यशवन्त होत जावें

मात्र "सार्थक जाहलें" या विचारा
मनीं स्वप्नींही मिळावा न थारा
विचाराची या झुळुक लागतांच
ऋद्धिसिद्धी जातात त्यजुनि साच

१६-६-१९३३

---

"माझा पापा घे" असें आपखुषीनें म्हणत पुढें आलेल्या बालकाचें अर्धस्फुट वदन म्हणजेच—

## मोक्षाचीं दारें

[ जाति–दिण्डी ]

नको चुम्बन मज देउं तुझें बाळा !
नसे तितुकी शुद्धता मम मुखाला.

नको त्या त्या अश्लील शब्द-कोटी
प्रगट झाल्या माझिया सदा ओठीं
खऱ्या-खोट्याचा कधिं न विधिनिषेध
धरुन, केला कटु वचें मर्म-भेद !

हवा दावाया स्वाभिमान जेथें
पुढें केलें मुख दीनपणें तेथें
असें दूषित जें कैक कलङ्कांनीं
नव्हे चुम्बाया योग्य निर्मलांनीं

साधुशीला, प्रभुतुल्य उदारा, तू
मनीं धरिसि न हा भेद-भाव-किन्तू
शरम माझी मजलाच मात्र वाटे
विटाळावें मी केंवि या मुखातें ?

* * *

येच अथवा ये बाळदेवराया !
काय दवडूं हा पर्वकाल वाया ?
स्वेच्छया तू सजलास चुम्बनास
कलङ्कांचा मम कराया निरास !

अरे पापांनो, भुतांनो, पळा रे !
पहा मोक्षाचीं मला खुलीं दारें !

१५-११-१९३३.

# गुलामा ! ओळख ही कुठली ?

गुलामा ! ओळख ही कुठली ?
आणि किती लाघवीपणानें लीला तव नटली !

अजुनि राङ्गतां पुरें येइना, वाचाहि न फुटली
परि दिसतां मी का हर्षाची फुटते गा उकळी ?

हात चिमुकले — पङ्ख पसरसी, ताराम्बळ सगळी
गळा बिलगसी तोंच सुखा तव सीमा कीं नुरली !

कोण पळे जरि दिसे स्वार्थ ना लाच न वा मिळली
मिठी मारुनी लाभ कोणता तुजला मजजवळी ?

तरिहि उमलते तुझी हासरी मोहक वदन-कळी
मजपुढती ब्रह्माण्डसुखाची पेठच कीं फुलली !

आणि निरखुनी तुला जाहलों दृष्टी-आड जरी
तीच मुखाची कळी क्षणीं का होते हिरमुसली ?

पुणें–मुंबई प्रवास.
२६-२-१९३१

---

# चिमुकल्या करपाशीं

[ जाति – चन्द्रकला ]

सुधे ! गुन्तवीसी गळा मम चिमण्या करपाशीं
परि सैरावैरा सुटे मन – घारच आकाशीं.

जाउनि दूर जरा मनानें जगतापासून
वडामोड इथली पहावी सकल तपासून.

स्वार्थाच्या रङ्गीं रङ्गले प्रेमाचे बन्ध
जडवुनि जीवाला घेतले तसले सम्बन्ध.

मृदु वच परक्याचे ऐकुनी सहानुभूतीचे
उद्भवतें नातें – आपुलेपण अनुभूतीचे

स्वार्थ-भावनेचे कुन्चले परन्तु त्यांवरही
फिरलेले दिसती निरखितां पुसट पुसट कांहीं

स्वार्थ-सुखाशेच्या लागुनी आंच भावनांची
प्रीतीचा पारा दावितो अवास्तवचि उञ्ची.

स्वार्थाच्या समरीं विरोधी चकमक हेतूंची
झडतां, क्षणिं मैत्री कळे ती किती उभयतांची

फिरवुनि वदनांना घेति ते दोघे दोन दिशा
विनाभावनेन्दू होतसे सुरु तेथून निशा
झपाटली जाई आणि तैं वैरानें मैत्री
वैरभाव चढता खरासम भासे गायत्री

*　　　*　　　*

गमतें जीवित हें मानवी व्यापारी पेठ
देवघेव काटेतोल ही करि जो तो शेठ

चालतसे कज्जेदलाली ईर्षावेशानें
स्वार्थ त्यांत हिण्डे प्रीतिच्या मोहक वेषानें

असल्या बाजारीं शिसारी फिरतांना येते
खऱ्या उदाराचें कार्यही हिणकस तों वाटे

परोपकाराच्या मुळाशीं असेल का स्वार्थ ?
मनास हा वेगें घेरतो सन्देहावर्त.

रडणारे प्राणी जीवही तोडतोडुनिया
नाटकीच गमती, कशाला लक्ष हवें द्याया ?

सलगी दावोनी कुणी जर गोडिगुलाबीनें
ऐसपैस जाळें पसरतां लाम्बीरुन्दीनें

'काय असावा हा पारधी' संशय मन घेई
जिव्हेवर भाषा येतसे 'दूर दूर भाई !'

असे जगामाजी आढळुनि येती संम्बन्ध
गाडीवानाच्या वृत्तिचे केवळ जे कन्द

नको नको ! देवा, यांतुनी दूर मला ठेव !
जग अवघें गमतें खरोखर जवसाचें पेव !

* * *

जगताला भिवुनी, त्रासुनी, विटुनी परतावें
सुधे! तुझें गाणें बोबडें कुतुकें परिसावें

"सैंपाकहि करुनी तुला मी वाढिन थोलपणीं"
घोळ-घोळुनी ही ओळ तूं म्हणसी फिरफिरुनी

भविष्यकाळाचा लागला साङ्ग कुणा थाङ्ग
वाढशील जरि तूं, दिवाळी तीच यथासाङ्ग

सकल चान्दण्यांनो! वाढत्या नभिच्या चन्द्रकले!
प्रचीतीस येवो न केव्हां 'भाकित हें हुकलें'!

भविष्यकाळाची तुम्हांवर ही जबाबदारी
भाउबीज माझी सुधेच्या होवो संसारीं!

* * *

कुठल्या जन्मींचा सुधे हा परि लागाबान्धा
तुज मज नच ठावें; घेसि तूं नित माझ्या छन्दा!
गळ्याभोंवतींची आपुली मिठी सोडिसी ना
स्ववश पूर्ण करिसी माझिया मना उदासीना

मन परवशतेच्या शृङ्खला वाञ्छी तोडाया
अधिकारी परि तूं माझिया मान्य एक हृदया

परदु:खाविषयीं अन्ध ते अधिकारारूढ
मानेवर देती सक्तिच्या हुकुमाचें धूड

परहित साधाया सर्वथा भ्याड आणि दुबळे
गरळ मात्र वमती मुकादम अपुल्या स्थान-बळें

मज परवशतेचा यामुळें रन्ध्रांरन्ध्रांत
तिटकारा भरला, वन्हि तो धडधडतो आंत

परि परवशतेच्या आग जी हृदिं तिटकाऱ्याची
क्षणार्धांत विझते मिठी तव पडतां हातांची

प्रीती निरपेक्षा, भावना निष्पापहि साऱ्या
निःस्वार्थी मन हें, तयाच्या तशाचहि भराऱ्या

शैशव असलें हें मनोहर बगीचाच भासे
त्यांत विहरतांना कुणाचें मानस नच हासे ?

मनीं उचम्बळुनी यापरी निवे भावगीत
होइ न सैल सुखे ! मिठी तव निद्रागुङ्गींत

येरवडा
विजयादशमी १८४५

जगताला भिवुनी, त्रासुनी, विटुनी परतावें
सुधे! तुझें गाणें बोबडें कुतुकें परिसावें

"सैंपाकहि कळुनी तुला मी वाळिन थोलपणीं"
घोळ-घोळुनी ही ओळ तूं म्हणसी फिरफिरुनी

भविष्यकाळाचा लागला साङ्ग कुणा थाङ्ग
वाढशील जरि तूं, दिवाळी तीच यथासाङ्ग

सकल चान्दण्यांनो! वाढत्या नभिच्या चन्द्रकले!
प्रचीतीस येवो न केव्हां 'भाकित हें हुकलें'!

भविष्यकाळाची तुम्हांवर ही जबाबदारी
भाउबीज माझी सुधेच्या होवो संसारीं!

* * *

कुठल्या जन्मींचा सुधे हा परि लागाबान्धा
तुज मज नच ठावें; घेसि तूं नित माझ्या छन्दा

गळ्याभोंवतींची आपुली मिठी सोडिसी ना
स्ववश पूर्ण करिसी माझिया मना उदासीना

मन परवशतेच्या शृङ्खला वाञ्छी तोडाया
अधिकारी परि तूं माझिया मान्य एक हृदया

परदु:खाविषयीं अन्ध ते अधिकारारूढ
मानेवर देती सक्तिच्या हुकुमाचें धूड

परहित साधाया सर्वथा भ्याड आणि दुबळे
गरळ मात्र वमती मुकादम अपुल्या स्थान-बळें

मज परवशतेचा यामुळें रन्ध्रांरन्ध्रांत
तिटकारा भरला, वन्हि तो धडधडतो आंत

परि परवशतेच्या आग जी हृर्दि तिटकाऱ्याची
क्षणार्धांत विझते मिठी तव पडतां हातांची

प्रीती निरपेक्षा, भावना निष्पापहि साऱ्या
निःस्वार्थी मन हें, तयाच्या तशाचहि भराऱ्या

शैशव असलें हें मनोहर बगीचाच भासे
त्यांत विहरतांना कुणाचें मानस नच हासे ?

मनीं उचम्बळुनी यापरी निंवे भावगीत
होइ न सैल सुधे ! मिठी तव निद्रागुङ्गींत

येरवडा
विजयादशमी १८४५

# माईच्या दारीं

[ जाति–मोहिनी ]
[ राग–कालिंगडा ]

नको करूं माई ऐसें दार तुझें बन्द
तुझ्या सम्पदेचा जीवा जडे पूर्ण छन्द

ग्रीष्म ऋतू जिकडे तिकडे येत आढळून
शीत वायुवीची येथें डुले स्नेहपूर्ण
झुळुक जरा सेवावी ती येतसे म्हणून
विश्व कूप कोन्दट वाटे असुनि लाम्ब रुन्द.

कुणीही न पसरी बाहू कफल्लकासाठीं
उगारून जो तो काठी लागतोच पाठीं.
इथें किती करिती भंवतीं देवदूत दाटी
मिठ्या देति, पीयूषाचे शिम्पतात बुन्द.

नको पुढें माझ्या ठेवूं मिठाइची वाटी
सहज मिळे हातीं नाहीं तिची भूक पोटीं
परी तुझें मन्तरलेलें सदन शान्तिपाठीं
त्यांत जरा नैराश्याचा दूर हो समन्ध.

पारवा निवारा घेई तुझ्या वळचणीशीं
धूळ पडे पङ्खावरची खालती जराशी
काय ? उदारा तूं !–गणिसी अशा उपाधीशी ?
नको लोटुं बाहेरी ही निशा कृष्ण धुन्द
नको करूं माई ऐसें दार तुझें बन्द.

२५-२-१९३४.

# संसार उपवनाऐसा

शोभतो तुझा संसार उपवनाऐसा ॥

तू विशाल वृक्षाऐसा असासि उदारा
वल्लरीसारखी तुझी प्रेमळा दारा
ताटवा फुलांचा फुले गमे सामोरा—
बाळांच्या वघुनि विलासा.

वाहती कालवे काव्यरसाचे गेहीं
सौहार्द-सुगन्धें भरली भाषा पाही
लोभले सारखे रसिक भृङ्गसे स्नेही
लुटतात सकल उल्हासा.

सन्तोष सञ्चरे कीं सुखकारी वारे
कारन्ज्यामधुनी उडती जेविं फवारे
आतिथ्य मोकळें नेइ लया श्रम सारे
करि वसन्त नित्य निवासा.

हा पान्थ पातला पतङ्ग भटकत कुठुनी
नेणार ना कळे कुठें प्रभञ्जन इथुनी
विसरेल काय परि इथें सुमनरेणूंनीं
जो दिधला ह्यास दिलासा ?

१७-१०-१९३१.

# अनुग्रह

[ जाति–भूपतिवैभव ]
[ राग–पहाडी मिश्र ]

कोठेंहि मला प्रभु ठेवा कांहिं न त्याचें
पुरवाल कोठवर लाड तुम्ही कितिकांचे ?

हे विहार सुन्दर प्रासादाभवतालीं
त्यामधें कशाला होउं लता फुललेली ?
पडतें न फूलही जिथें दृष्टिला देवा
तेथेंच आपुली प्रभो चालविन सेवा.

रङ्गला गायनीं मेळा गन्धर्वांचा
मी धरूं कशाला त्यांत रमाया वाञ्छा ?
ओसाड माळ हे,—यांतच मजला ठेवा
येथेंच आपुली प्रभो चालविन सेवा.

ज्या स्थळीं विदूषक खुशामती करतात
हासवूं कुणा मी तिथें काढुनी दात
न्या दैवहतांमधि, स्मशानांत न्या किंवा
तेथेंच आपुली प्रभो चालविन सेवा.

मागणें कांहिं जर, न मागतों स्थळकाळ
तें एक पुरवितां दुजें हिरावुनि न्याल
कसल्याहि कुणाच्या न सम्पदेचा हेवा
कोठेंहि आपुली प्रभो चालविन सेवा.

# यशोगन्ध

केलेत अनुग्रह ते न निकामी व्हावे
ते चढते फुलते मात्र अखण्ड रहावे
मग परोपरींच्या दैन्यांचाहि न केवा
कोठेंहि आपुली प्रभो चालविन सेवा.

पुणे–मुम्बई–प्रवास
२८-७-१९३४

मराठी ग्रं... संग्रहालय ठाणे
५३६८

वि
श्रा
न्ति

REFBK-0005368

# रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १. किरण ( गद्यपद्य, मण्डळ ) | किंमत | ०४ |
| २. काव्यविचार ( काव्यविषयक निबन्ध, मण्डळ ) | | १ |
| ३. उषा ( पद्य, मण्डळ ) | | ०१२ |
| ४. मधुमाधव ( पद्य, घाटे-माधवजूलियन् ) | | ०१२ |
| ५. शलाका ( गद्यपद्य, मण्डळ ) | | १ |
| ६. विरहतरङ्ग ( खण्डकाव्य, माधवजूलियन् ) | | ०८ |
| ७. कला ( खण्डकाव्य, गिरीश ) | | ०६ |
| ८. नाट्यरूप महाराष्ट्र ( ऐतिहासिक प्रवेश, विठ्ठलराव घाटे ) | | १ |
| ९. छन्दोरचना ( मराठी वृत्तशास्त्र, प्रो. पटवर्धन ) | | २ |
| १०. प्रभा ( गद्यपद्य, मण्डळ ) | | ०८ |
| ११. सुधारक ( खण्डकाव्य, माधवजूलियन् ) | | १०८ |
| १२. आम्बराई ( खण्डकाव्य, गिरीश ) | | १ |
| १३. यशोधन ( पद्य, यशवन्त ) | | १०८ |
| १४. उमरखय्यामच्या रुबाया ( पद्य, प्रो. पटवर्धन ) | | १०८ |
| १५. भावमन्थन ( पद्य, यशवन्त ) | | ०८ |
| १६. काञ्चनगङ्गा ( पद्य, गिरीश ) | | १०८ |
| १७. द्राक्षकन्या ( पद्य, माधवजूलियन ) | | ०१२ |
| १८. बन्दीशाळा ( खण्डकाव्य, यशवन्त ) | | १०८ |
| १९. गजलाञ्जली ( पद्य, माधवजूलियन् ) | | १ |
| २०. जयमङ्गला ( खण्डकाव्य, यशवन्त ) | | १ |
| २१. फलभार ( पद्य, गिरीश ) | | ०१२ |
| २२. अभागी कमल ( खण्डकाव्य, गिरीश ) | | १ |
| २३. स्वप्नरञ्जन ( पद्य, माधवजूलियन् ) | | १ |
| २४. यशोगन्ध ( पद्य, यशवन्त ) | | १ |

परचुरे, पुराणिक आणि मण्डळी, मुंबई ४

य. दि. पेण्ढरकर, ५६८, नारायण, पुणें २